cmyk

## संपादकीय

### ‘घोषणांचा महापूर, उत्तरांचा दुष्काळ’

२०१४ नंतर देशाच्या राजकारणात मोठे बदल झाले. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक, डिजिटल इंडिया, परराष्ट्र धोरण, कल्याणकारी योजना आणि प्रशासनातील तांत्रिक बदल यांसारख्या अनेक उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी मिळाली. त्याचबरोबर बेरोजगारी, परीक्षा व्यवस्थेतील गैरव्यवहार, महागाई, शेतकरी आंदोलन, विद्यार्थी आंदोलन, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संस्थांच्या स्वायत्ततेबाबतही अनेक प्रश्न उपस्थित झाले. या प्रश्नांवर समाजात मतभेद असू शकतात; परंतु त्यावर चर्चा होणे हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी आवश्यकच आहे.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–६ अंक–१२४ शुक्रवार दि.२४ जुलै २०२६ RNI No.: MAHMAR/2021/858 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### न्यायाधीशांविरोधात वकिलांचे आंदोलन

बंगळूरू : देशभरात विविध प्रश्नांवर आंदोलनं सुरू असतानाच आता कर्नाटकातील बेंगळुरूमध्ये मोठा वाद समोर आला आहे. ॲडव्होकेट्स असोसिएशन, बेंगळुरूने कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश विभू बखरू यांच्या विरोधात आंदोलन केले आहे. न्यायालयीन प्रशासनातील कथित निष्काळजीपणा आणि प्रलंबित प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत वकिलांनी उच्च न्यायालयाबाहेर जोरदार निदर्शने केली. न्यायालयातील प्रशासनिक कामकाज होत नसल्यामुळे वकिलांना तसेच न्यायासाठी येणाऱ्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. वकिलांच्या म्हणण्यानुसार, न्यायालयीन व्यवस्थेतील अनेक मूलभूत प्रश्नांकडे मुख्य न्यायाधीशांनी दुर्लक्ष केले असून त्यामुळे न्यायप्रक्रियेवर परिणाम होत आहे.

### सर्वोच्च न्यायालयाकडून सोनम रघुवंशीचा जामीन रद्द

दिल्लीः देशभरातील बहुचर्चित ‘हनीमून मर्डर केस’ प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी (दि. २३) महत्त्वाचा निर्णय दिला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी सोनम रघुवंशी हिचा जामीन सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे. न्यायालयाने तिला आत्मसमर्पण करण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली आहे. सोनम हिला कनिष्ठ न्यायालयाने दिलेला जामीन आणि तो निर्णय कायम ठेवण्याचा मेघालय उच्च न्यायालयाचा निर्णय घेतला होता. याविरोधात मेघालय सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर न्यायाधीश एम. एम. सुंदरेश आणि न्यायाधीश पी. बी. वराळे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. खंडपीठाने सोनम रघुवंशी हिचा जामीन रद्द केला. तसेच तिला आत्मसमर्पण करण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली आहे.

### विद्यार्थिनींवर लाठीचार्ज वेदनादायी–मुरली मनोहर

दिल्लीः नीट पेपरफुटीप्रकरणी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या मुद्द्यावरून आता नरेंद्र मोदी सरकार स्वकीयांच्याच निशाण्यावर आले आहे. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी मानव संसाधन विकास मंत्री मुरली मनोहर जोशी यांनी जंतर–मंतरवर प्रदर्शन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या बळप्रयोगाची तीव्र निंदा केली आहे. ‘‘सरकारने या आंदोलनाकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहू नये,‘‘ असा सल्लाही त्यांनी दिला आहे. भाजपच्या मार्गदर्शक मंडळाचे सदस्य असलेल्या मुरली मनोहर जोशी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म (पूर्वीचे ट्विटर) वर एक पोस्ट शेअर करत आपली नाराजी व्यक्त केली. त्यांनी लिहिले, ‘‘देशाच्या विविध भागांतून आलेले तरुण विद्यार्थी गेल्या अनेक दिवसांपासून नवी दिल्लीच्या रस्त्यांवर जमा झाले आहेत, हे दृश्य अत्यंत वेदनादायी आहे. विद्यार्थ्यांच्या चिंता आणि मागण्या रास्त आहेत. त्याकडे सहानुभूतीने आणि दीर्घकालीन उपायांच्या दृष्टिकोनातून पाहिले गेले पाहिजे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२३ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ११०.५० क्विंटल | २,१८६ | २,७८१ | २,६१३ |
| ज्वारी/हायब्रिड :५२.०० क्विंटल | २,२७१ | ४,९०० | ३,०२९ |
| मका/लोकल: २०.०० क्विंटल | २,३२३ | २,३२३ | २,३२३ |
| तूर : १७.०० क्विंटल | ७,५९१ | ७,८९९ | ७,७४५ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी:३९.५० क्विंटल | २,४०० | २,७८२ | २,६४० |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ५,५०१ | ५,७७१ | ५,६३६ |

# पीक कर्जवाटपात राष्ट्रीयीकृत बँका पुन्हा अपयशी

## केवळ ३८ टक्के लक्ष्य पूर्ण, मुख्यमंत्र्यांच्या इशाऱ्यानंतरही बँकांची उदासिनता कायम

मुंबई । प्रतिनिधी

**खरीप हंगाम २०२६ साठी राज्यातील पीक कर्जवाटपाच्या प्रगतीचा आढावा घेतल्यास राष्ट्रीयीकृत बँकांची शेतकऱ्यांप्रती असलेली उदासीनता पुन्हा एकदा समोर आली आहे. राज्य सरकारने यंदा ६४ लाख शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवले असले, तरी सर्वाधिक जबाबदारी असलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांनी केवळ ३८ टक्के कर्जवाटप करून अत्यंत निराशाजनक कामगिरी केली आहे. त्यामुळे खरीप हंगामाच्या मध्यावरही लाखो शेतकरी कर्जाच्या प्रतीक्षेत असल्याचे चित्र आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रीयीकृत बँकांना स्पष्ट इशारा देत, पीक कर्ज वितरणात कुचराई करणाऱ्या बँकांची गय केली जाणार नाही, असे जाहीरपणे सांगितले होते. मात्र, त्यानंतरही बँकांच्या कामगिरीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याचे १३ जुलैपर्यंतच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे राज्य सरकार आता या बँकांवर कोणती प्रशासकीय किंवा दंडात्मक कारवाई करते, याकडे शेतकरी आणि कृषी क्षेत्राचे लक्ष लागले आहे. राज्यस्तरीय आकडेवारीनुसार, खरीप हंगामासाठी निश्चित करण्यात आलेल्या ५२,५२२ कोटी रुपयांच्या उद्दिष्टापैकी १३ जुलैपर्यंत केवळ २९,४२० कोटी रुपयांचे पीक कर्ज वितरित झाले असून, हे एकूण लक्ष्याच्या ५६ टक्के आहे. खरीप पेरणीचा मोठा टप्पा पूर्ण झाल्यानंतरही जवळपास निम्मे कर्जवाटप शिल्लक असल्याने अनेक शेतकऱ्यांना खासगी सावकार किंवा इतर पर्यायांचा आधार घ्यावा लागत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. याउलट जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी उत्कृष्ट कामगिरी करत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. या बँकांना १९,९६४ कोटी रुपयांचे लक्ष्य देण्यात आले होते. त्यापैकी १७,६२५ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करून त्यांनी तब्बल ८८ टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे. या माध्यमातून ११.११ लाख शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज उपलब्ध झाले असून, सहकारी बँकांनी पुन्हा एकदा ग्रामीण भागातील विश्वासार्ह आर्थिक संस्था असल्याचे सिद्ध केले आहे. दुसरीकडे राष्ट्रीयीकृत बँकांना २२,९५४ कोटी रुपयांचे सर्वाधिक लक्ष्य देण्यात आले होते. मात्र, त्यांनी केवळ ८,६७७ कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले असून, हे लक्ष्याच्या अवघ्या ३८ टक्के आहे. तसेच फक्त ४.१७ लाख शेतकऱ्यांपर्यंतच कर्ज पोहोचले आहे. त्यामुळे लाखो पात्र शेतकरी अद्याप कर्जापासून वंचित असल्याची बाब

▶▶ पान २ वर

# आंदोलक पुन्हा एकवटले!

## दिल्ली पोलीस आयुक्तांना थेट अटकेचे विशेष अधिकार, रासुका लावण्याची तयारी



दिल्ली । वृत्तसंस्था

**दिल्लीतील जंतर–मंतरवर कॉकरोच जनता पार्टीचे धरणे आंदोलन दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून प्रशासनाने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. दिल्ली सरकारच्या गृह (पोलीस–२) विभागाने एक महत्त्वपूर्ण अधिसूचना जारी करत दिल्ली पोलीस आयुक्तांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्या अंतर्गत कारवाई करण्याचे विशेष अधिकार दिले आहेत.**

गृह विभागाने जारी केलेल्या या अधिसूचनेनुसार, पोलीस आयुक्तांना राष्ट्रीय सुरक्षा कायदा, १९८० अंतर्गत कोणत्याही व्यक्तीला प्रतिबंधात्मक अटक करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. राष्ट्रीय सुरक्षा कायद्याच्या कलम ३(३) आणि कलम २ अन्वये देण्यात आलेले हे विशेष अधिकार १९ जुलै २०२६ ते १८ ऑक्टोबर २०२६ या तीन महिन्यांच्या

▶▶ पान २ वर

### “ नीट पेपर फुटीप्रकरणातील मुख्य आरोपीला क्लिनचीट

नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणावरून आंदोलन तापलेले असतानाच आता पेपरफुटी प्रकरणातून एक सर्वात महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. या संपूर्ण प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी संजीव कुमार उर्फ संजीव मुखिया याला केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) पूर्णपणे क्लिनचिट दिली आहे. २०२४ ची प्रश्नपत्रिका फोडण्यात किंवा ती वितरित करण्याच्या कटामध्ये संजीव मुखियाचा थेट अथवा अप्रत्यक्ष सहभाग असल्याचे कोणतेही पुरावे तपासात आढळून आले नाहीत. त्यामुळे सीबीआयकडून त्याच्याविरोधात कोणतेही आरोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही. बिहार पोलिसांनी – प्रश्नपत्रिका चोरीचा प्रकार उघडकीस आणून याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. यापूर्वीच्या अनेक प्रश्नपत्रिका चोरी आणि पेपरफुटीच्या प्रकरणांमध्ये नाव असल्याने प्राथमिक संशयावरून बिहार पोलिसांनी एफआयआर मध्ये संजीव मुखियाला आरोपी म्हणून नमूद केले होते.

### “ मोदींकडून पेपर फुटी प्रकरणाची जलद सुनावणीची घोषणा

परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या आरोपांवरून महिनाभरापूर्वी सुरू झालेले हे आंदोलन आता एका व्यापक चळवळीत रूपांतरित झाले आहे. या चळवळीतून सरकारचे उत्तरदायित्व, बेरोजगारी आणि तरुण भारतीयांच्या संधी यांबाबतच्या चिंता व्यक्त केल्या जात आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी फास्ट–ट्रॅक न्यायालये स्थापन करण्याची घोषणा केली; या मुद्द्यावर त्यांची ही पहिलीच सार्वजनिक प्रतिक्रिया होती.

## खतामुळे शेतकऱ्याचा मृत्यू

केज । प्रतिनिधी

**केज शहरातील धारूर रोडवरील भवानी चौकात गुरुवारी (दि.२३) सकाळी झालेल्या भीषण अपघातात टिप्परच्या धडकेत खते आणण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, गुरूवारी सकाळी सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास धारूरकडून मुरूम घेऊन येणारा टिप्पर (क्र. एमएच ४४/यू ९९७१) अंबाजोगाईकडे जाण्यासाठी डावीकडे वळत होता. त्याचवेळी तांबवा येथील शेतकरी नितीन आदिनाथ चाटे (वय ३५, रा. तांबवा, ता. केज) हे दुचाकी (क्र. जीए ०३/एए ८१२८) वरून त्याच दिशेने जात असताना टिप्परची धडक बसली. धडकेनंतर नितीन चाटे हे टिप्परच्या मागील चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण किर्तने, बाळासाहेब रोडे, शकील शेख, हेडकॉन्स्टेबल बाळासाहेब अहंकारे तसेच शिवाजी कागदे, सिद्दिक शहा, त्र्यंबक सोपने आणि नितीन वारे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. पुढील तपास सुरू आहे. घटनेनंतर अपघातस्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली. अपघाताच्या या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# विद्यार्थ्याला ड्रग्जची पावडर खिशात ठेवण्याची धमकी देणारा पोलिस निलंबीत

मुंबई । प्रतिनिधी

सोशल मीडियावर एका व्हीडीओमध्ये पोलिस तरुणाला धमकावताना दिसत आहे. पुन्हा दिसलास तर ५० ग्रॅमची पावडर खिशात टाकेन अशी धमकी तो देत आहे. गुरूवारी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. त्यात राज ठाकरे यांनी हाच किस्सा सांगितला. ते म्हणाले, माझ्याकडे एक व्हीडीओ आला. मुलं टॅक्सीने चालली



होती. पोलिस म्हणतात ५० ग्रॅम पावडर टाकेन. हा पोलिस ड्रग्ज सप्लायर आहे का? पोलिसांकडे पावडर मिळायला लागली का? हे काय चालले ते कळतच नाही, असे राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरे यांची पत्रकार परिषद झाल्यानंतर काही वेळातच गृहखात्याकडून या पोलिसाविरोधात कारवाई करण्यात आली.

पवन सांगळे असे या पोलिसाचे नाव आहे. सायन पोलिस स्टेशनला तो ड्रायव्हर म्हणून काम करतो. या व्हीडीओमुळे मुंबई पोलिसांबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले होते. सोशल मीडियावर उलट–सुलट चर्चा सुरू आहे. त्यामुळे आता मुंबई पोलिसांनी धमकी

▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय!

## पुणे, सातारा जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी



पुणे । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने राज्यात पुन्हा एकदा दमदार पुनरागमन केले आहे. मुंबई आणि उपनगरांमध्ये गेल्या तीन दिवसांपासून पावसाच्या जोरदार सरी कोसळत असून, उर्वरित महाराष्ट्रातही पावसाला सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून राज्यासाठी एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

पुणे हवामान विभागाचे प्रमुख एस. डी. सानप यांनी राज्यातील हवामानाबाबत सविस्तर माहिती दिली आहे. त्यांच्या मते, २५ जुलैपर्यंत राज्यात पावसाचा जोर कायम राहील. विशेषतः पुणे आणि सातारा जिल्ह्यांमधील

▶▶ पान २ वर

# पेपरफुटीविरोधात ठाकरे बंधूं मैदानात!

## २६ जुलैला विद्यार्थी–पालकांसह मुंबईत विराट मोर्चा, सरकारला इशारा

मुंबई । प्रतिनिधी

**देशभरात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. विद्यार्थ्यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत, सत्तेवर असणाऱ्यांनी केवळ अधिकारच नव्हे तर अपयशाची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे, असे ते म्हणाले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत शिवतीर्थ येथील निवासस्थानी झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनासह शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नांवर भाष्य केले.**

राज ठाकरे म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून



देशभरात विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. सुरुवातीला हे आंदोलन शांततापूर्ण होते, मात्र त्यानंतर आंदोलनकर्त्यांवर दबाव आणण्याचे आणि आंदोलन मोडून काढण्याचे प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी केला. विद्यार्थ्यांवरील कारवाईचे पडसाद देशभर उमटत असून महाराष्ट्र आणि मुंबईतही त्याचे परिणाम दिसत असल्याचे त्यांनी नमूद केले. राज ठाकरे यांनी सरकारला लक्ष्य करत सांगितले की, कोणत्याही पदाची जबाबदारी स्वीकारताना त्या पदाशी संबंधित यशाबरोबरच अपयशाची जबाबदारीही स्वीकारावी लागते. विद्यार्थ्यांचीही हीच मागणी असून संबंधित प्रकरणाची नैतिक जबाबदारी निश्चित झाली पाहिजे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी पूर्वीच्या काही घटनांचा उल्लेख करत, विरोधी पक्षात असताना भाजपने विविध प्रकरणांमध्ये मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती, अशी आठवण करून दिली. राज ठाकरे यांनी परीक्षा व्यवस्थेवरही प्रश्न उपस्थित केले. परीक्षा पूर्णपणे केंद्रीकृत पद्धतीने घेण्याबाबत त्यांनी पूर्वीच आक्षेप घेतला होता, असा

▶▶ पान २ वर



## शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळ नको–राजू शेट्टीं

पुणे । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात केवळ ५३३ शेतकऱ्यांची यादी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी जाहीर केली. यावरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. ही तर शेतकऱ्यांची चेष्टा आहे. पाऊस लांबला आहे. शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट आहे.

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# 'घोषणांचा महापूर, उत्तरांचा दुष्काळ'

२०१४ नंतर देशाच्या राजकारणात मोठे बदल झाले. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक, डिजिटल इंडिया, परराष्ट्र धोरण, कल्याणकारी योजना आणि प्रशासनातील तांत्रिक बदल यांसारख्या अनेक उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी मिळाली. त्याचबरोबर बेरोजगारी, परीक्षा व्यवस्थेतील गैरव्यवहार, महागाई, शेतकरी आंदोलन, विद्यार्थी आंदोलन, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संस्थांच्या स्वायत्ततेबाबतही अनेक प्रश्न उपस्थित झाले. या प्रश्नांवर समाजात मतभेद असू शकतात; परंतु त्यावर चर्चा होणे हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी आवश्यकच आहे.

आजचा युवक केवळ राजकीय घोषणांनी किंवा व्यक्तिपूजेमुळे प्रभावित होत नाही. डिजिटल युगात वाढलेल्या या पिढीकडे माहिती मिळवण्याची अनेक साधने आहेत. सोशल मीडिया, स्वतंत्र पत्रकारिता, विविध डिजिटल प्लॅटफॉर्म आणि माहितीचा अधिकार यामुळे युवक केवळ ऐकून विश्वास ठेवत नाही, तर तो तथ्यांची पडताळणी करण्याचा प्रयत्न करतो. सरकार कोणतेही असो, त्याच्या धोरणांबाबत प्रश्न विचारणे ही लोकशाहीची नैसर्गिक प्रक्रिया आहे, याची जाणीव या पिढीला अधिक स्पष्टपणे होताना दिसते. भारतीय लोकशाहीत प्रत्येक निवडणूक महत्त्वाची असते. मात्र काही निवडणुका केवळ सत्तांतरापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या समाजाच्या विचारसरणीत होत असलेल्या बदलांचेही प्रतिबिंब ठरतात. २०२९ ची लोकसभा निवडणूक अशीच एक निवडणूक ठरू शकते का, हा प्रश्न आता गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे. कारण आज भारतीय राजकारणात सर्वाधिक लक्ष वेधून घेणारा घटक म्हणजे बदलत चाललेली तरुण पिढी. आज देशातील लाखो तरुणांसाठी सर्वात मोठी चिंता रोजगाराची आहे. पदवीधरांची संख्या वाढत असताना गुणवत्तापूर्ण नोकऱ्या त्याच वेगाने निर्माण होत आहेत का? स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब, वारंवार होणाऱ्या परीक्षा रद्द आणि रिक्त सरकारी पदांचा प्रश्न हा केवळ प्रशासनिक त्रुटींचा विषय राहिलेला नाही; तो तरुणांच्या आयुष्याशी, मानसिक आरोग्याशी आणि सामाजिक विश्वासाशी जोडलेला प्रश्न बनला आहे. सरकारने यावर केवळ आश्वासने नव्हे तर मोजता येतील अशी परिणामकारक उत्तरे द्यायला हवीत. याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे टीकेविषयीची वाढती असहिष्णुता. लोकशाहीत सरकारवर टीका करणे हा अधिकार आहे; उपकार नाहीत. पत्रकार, विद्यार्थी, कार्यकर्ते, प्राध्यापक किंवा विरोधी पक्षहे सर्व लोकशाहीच्या संवादाचा भाग आहेत. परंतु जेव्हा मतभिन्नतेला वारंवार राष्ट्रविरोधाशी जोडले जाते, तेव्हा सार्वजनिक चर्चेची जागा आकुंचन पावते. सरकारला अस्वस्थ करणारे प्रश्न विचारले जात आहेत, याचा अर्थ लोकशाही जिवंत आहे; ती धोक्यात आली आहे, असा नाही. संस्थांच्या स्वायत्ततेबाबतचे प्रश्नही दुर्लक्षित करता येणार नाहीत. निवडणूक आयोग, तपास यंत्रणा, माहिती आयोग, विद्यापीठे आणि सार्वजनिक प्रसारमाध्यमे यांच्याबाबत समाजात निर्माण होणाऱ्या शंका ही केवळ विरोधकांची राजकीय भाषा म्हणून फेटाळता येत नाहीत. लोकशाहीत संस्थांवरील विश्वास हा तितकाच महत्त्वाचा असतो जितकी त्यांची औपचारिक रचना. जर नागरिकांना संस्था निष्पक्षपणे काम करत असल्याचा विश्वास उरला नाही, तर निवडणुका होऊनही लोकशाही कमकुवत होऊ शकते. शेतकरी आंदोलनापासून विद्यार्थी आंदोलनांपर्यंतच्या अनुभवांनी एक गोष्ट स्पष्ट केली आहेलोक प्रश्न विचारत आहेत. प्रश्न एवढाच आहे की सत्ता ऐकते आहे का? संवादाची जागा उरली आहे का? संसद ही वादविवादाची संस्था आहे की केवळ संख्याबळ सिद्ध करण्याचे व्यासपीठ? बहुमत असणे महत्त्वाचे असते; पण बहुमतामुळे विरोधी मत अनावश्यक ठरत नाही मात्र या प्रक्रियेत विरोधी पक्षांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. जर युवक स्वतःच प्रश्न विचारत असतील, तर त्या प्रश्नांना धोरणात्मक दिशा देणे, पर्यायी उपाय मांडणे आणि जनतेसमोर विश्वासार्ह पर्याय उभा करणे ही विरोधी पक्षांची जबाबदारी आहे. केवळ सरकारवर टीका करणे किंवा संसदेतील गदारोळ पुरेसा ठरत नाही. लोकांना घोषणांपेक्षा ठोस कार्यक्रम, सातत्यपूर्ण जनसंपर्क आणि विश्वासार्ह नेतृत्व अपेक्षित असते. विरोधी पक्षांनीही या बदलत्या जनमानसाचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. सत्ताधारी पक्ष आणि त्याच्याशी संबंधित विचारप्रवाहांबाबतही समाजात विविध मतप्रवाह आहेत. काहींच्या मते त्यांनी विकास आणि राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले आहे, तर काही जण सत्तेचे केंद्रीकरण, मतभिन्नतेबाबत असहिष्णुता किंवा संस्थांवरील प्रभाव यांसारख्या मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित करतात. या दोन्ही भूमिका सार्वजनिक चर्चेचा भाग आहेत. लोकशाहीत या मतांचे अंतिम मूल्यमापन मतदानाच्या माध्यमातून जनताच करते. त्यामुळे कोणत्याही राजकीय पक्षाचे किंवा विचारसरणीचे मूल्यांकन भावना, प्रचार किंवा पूर्वग्रहांवर नव्हे, तर प्रत्यक्ष कामगिरी आणि तथ्यांवर आधारित असले पाहिजे. लोकशाहीची खरी ताकद ही भीतीमुक्त संवादात असते. सरकारचे समर्थन करणे जितके वैध आहे, तितकेच सरकारवर टीका करणेही घटनात्मक अधिकार आहे. नागरिकांनी आपली भूमिका विवेकाने आणि माहितीच्या आधारे ठरवणे हीच लोकशाहीची खरी ओळख आहे. मतभिन्नता ही लोकशाहीची कमजोरी नसून तिची सर्वात मोठी ताकद आहे. याच पार्श्वभूमीवर २०२९ ची लोकसभा निवडणूक महत्त्वाची ठरते. ही निवडणूक केवळ कोण सत्ता स्थापन करणार यापुरती मर्यादित राहणार नाही. तरुण मतदार विकास, रोजगार, शिक्षण, आर्थिक संधी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि संस्थांवरील विश्वास यांसारख्या मुद्द्यांना किती प्राधान्य देतो, याचीही ती कसोटी असेल. राजकीय पक्षांसाठीही हा आत्मपरीक्षणाचा क्षण असेलते व्यक्तिकेंद्री राजकारणावर भर देतात की मुद्दाकेंद्री राजकारणावर, याचे उत्तर मतदारच देणार आहेत. शेवटी, प्रश्न कोणत्या पक्षाचा किंवा कोणत्या नेत्याचा नाही. प्रश्न भारतीय लोकशाहीच्या गुणवत्तेचा आहे. सत्ताधारी पक्षाने उत्तरदायित्व स्वीकारले पाहिजे, विरोधी पक्षाने सक्षम पर्याय उभा केला पाहिजे आणि नागरिकांनी सजगपणे प्रश्न विचारत राहिले पाहिजेत. कारण लोकशाहीत अंतिम निर्णय कोणत्याही नेत्याचा नसतो; तो मतदाराचा असतो. २०२९ ची निवडणूक भारताच्या राजकीय इतिहासात नवा अध्याय लिहील की नाही, हे आज सांगणे अशक्य आहे. मात्र एक गोष्ट निश्चित आहेजर तरुण मतदार विचारपूर्वक, तथ्यांच्या आधारे आणि भीतीमुक्त वातावरणात आपला निर्णय घेत राहिला, तर भारतीय लोकशाही अधिक परिपक्व, अधिक उत्तरदायी आणि अधिक मजबूत होईल. तेच कोणत्याही सशक्त लोकशाहीचे खरे यश आहे.

# कॉँग्रेस-भाजप कार्यकर्ते जालन्यात आमनेसामने

## जोरदार घोषणाबाजी, पोलिसांच्या हस्तक्षेपाने तणाव निवळला



**जालना । प्रतिनिधी**

जालन्यात भाजप आणि कॉँग्रेसचे कार्यकर्ते समोरासमोर आंदोलन झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी कॉँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजपचा आंदोलन अडवली यावेळी दोन्ही पक्षांच्या कार्यकत्यांनी एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाबाहेर कॉँग्रेस नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि इतर कॉँग्रेस नेते- कार्यकत्यांनी धरणे आंदोलन केले होते. त्याच्या निषेधार्थ जालन्यात भाजपच्या वतीने आंदोलन करण्यात आले. कॉँग्रेसचे खा. डॉ. कल्याण काळे यांच्या संपर्क कार्यालयाबाहेर भाजप कार्यकत्यांनी राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत त्यांचा निषेध व्यक्त केला. त्यावेळी कॉँग्रेस कार्यकर्तेही घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी भाजपविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरु केली. त्यामुळे काही काळ दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आमनेसामने आले. दोन्ही बाजूंनी जोरदार घोषणाबाजी झाल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत दोन्ही पक्षांच्या कार्यकत्यांना वेगळे केले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. मात्र, काही काळ परिसर जोरदार घोषणाबाजीने दणाणून गेला होता. भाजपचे आंदोलन संपल्यानंतर कॉँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलनस्थळी गोमूत्र शिंपडून त्या जागेची शुद्धी केल्याचे पाहायला मिळाले.

# गुटखा प्रकरणात जामीन मंजूर-अ‍ॅड. तेजस नेहरकर



**बीड । प्रतिनिधी**

घटनेची थोडक्यात थोडक्यात हकीगत अशी दिनांक ५ जुलै २०२६ रोजी गोपनिय माहितीवरून अन्न व औषध प्रशासन सुरक्षा अधिकारी महाराष्ट्र राज्य बीड तसेच त्यांच्यासोबत पोलीस स्टेशन कर्मचारी यांनी बार्शी नाका ते सोलापूर हायवे पासून इमामपूर रोड वर छापा टाकून आरोपी विलास भगवान जाधव यास इनोव्ह गाडीसह सात लाख ८ हजार रुपये चे गुटखा मिळून आला म्हणून पकडून अन्न व सुरक्षा मानके कायदा २००६ चे कलम २६(२) २७ ३( डी )२७ ३ सहवाचन कलम ३० (२) , २०२३ प्रमाणे कलम ५९,१२३,२२३,२७४ ,२७५.चा भांग करून शिक्षा पात्र कलम ५९ प्रकरणी मानवी आरोग्यास हानिकारक असलेल्या प्रतिबंधित खाद्य पदार्थाच्या विक्री करिता साठा करीत असल्याचे आढळून आल्याने सदर प्रतिबंधित अन्नपदार्थाचे लेबल निरीक्षण केले असता सदर प्रतिबंधित अन्नपदार्थ वरील तक्त्यात पुरवठादार मालक भागीदार संचालक यांनी प्रतिबंधित असताना देखील विक्री कामे व्यक्त आस्थापनेचे अन्नपदार्थ पुरवठा केले बाबत यांची चौकशी करून संबंधितावर विविध कलमाने गुन्हा रजिस्टर नंबर, २२१/२०२६ पोलीस स्टेशन पेठ बीड येथे गुन्हा दाखल केला होता .तसेच आरोपीला अटक केली होती त्या प्रकरणात आरोपीने जामीन मिळणे साठी अँड.तेजस एस.नेहरकर यांच्यामार्फत जिल्हा न्यायालयात जामीन साठी अर्ज दाखल केला होता. त्या अर्जावर दिनांक २१/०७/ २०२६ रोजी माननीय न्यायालयाने आरोपीस अटीवर शतीवर जामीन मंजूर केला आहे या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड . तेजस एस.नेहरकर यांनी काम पाहिले त्यांना ॲड. गौतम नाईकवाडे, ॲड .रविराज व्हि.राठोड, ॲड.दत्ता केसकर, ॲड .शेख शिकंदर यांनी सहकार्य केले.

# गुजरातमधील पुरात अडकलेल्या ३५ पर्यटकामध्ये परळीतील दोघांचा समावेश; सुखरूप सुटका

## आ. धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाच्या तत्परतेने कुटुंबियांचा झाला संपर्क

**परळी वै.। वार्ताहर**

गुजरातमधील वलसाड जिल्ह्यात नदीला आलेल्या अचानक पुरामुळे महाराष्ट्रातील सुमारे ३५ पर्यटक अडकल्याची घटना घडली. मात्र, गुजरात प्रशासनाने तातडीने हेलिकॉप्टरद्वारे बचाव मोहीम राबवत सर्व पर्यटकांची सुखरूप सुटका केली. या पर्यटकांमध्ये परळी वैजनाथ येथील रुपेश झंवर व त्यांची पत्नी जान्हवी झंवर या दाम्पत्याचाही समावेश होता. या पूर परिस्थितीमध्ये अडकलेल्या या दाम्पत्यांचा संपर्क तुटला होता.त्यांच्याशी संपर्क होत नसल्याने नातेवाईक चिंताग्रस्त होते.मात्र याबाबत आ.धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाने तातडीने संबंधित गुजरात प्रशासनाशी संपर्क केला.संबधित छावणी व त्याठिकाणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधत झंवर दाम्पत्यांचा संपर्क करून दिला.

खासगी ट्रॅव्हल बसने प्रवास करत असतांना वलसाड जिल्ह्यातील औरंगा नदीला आलेल्या पुरामुळे बसचा मार्ग बंद झाला आणि पर्यटक अडकून पडले. घटनेची माहिती मिळताच गुजरात प्रशासन, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, स्थानिक यंत्रणा आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पुराच्या पाण्यामुळे रस्ता पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने हेलिकॉप्टरच्या साहाय्याने बचावकार्य राबविण्यात आले. एक-एक करून सर्व पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. सर्व पर्यटक सुरक्षित असून कोणालाही गंभीर दुखापत झालेली नसल्याची माहिती प्रशासनाने दिली. या घटनेमुळे महाराष्ट्रातील पर्यटकांच्या कुटुंबीयांमध्ये काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः परळी वैजनाथ येथील झंवर दाम्पत्याशी संपर्क तुटल्याने त्यांच्या नातेवाईकांची चिंता वाढली होती. याबाबत माहिती मिळताच परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाने तातडीने पुढाकार घेत संबंधित यंत्रणांशी संपर्क साधला आणि झंवर दाम्पत्याचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क करून दिला. त्यानंतर त्यांच्या नातेवाईकांनी सुटकेचा निश्वास टाकला. अडचणीच्या प्रसंगी आपल्या मतदारसंघातील नागरिकांना तत्काळ मदत मिळावी यासाठी आमदार धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने केलेल्या प्रयत्नांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# ३६,५८५ कोटींची कर्जमाफी, ४८ हजार कोटींची वीजबिल माफी; शेतकरीहिताचे निर्णय जनतेपर्यंत पोहोचवणार-आ. बबनराव लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने ₹३६,५८५ कोटींच्या या ऐतिहासिक योजनेला मंजुरी देत राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. पात्र शेतकऱ्यांचे मुद्दल व व्याजासह ₹२ लाखांपर्यंतचे अल्पमुदतीचे पीक कर्ज माफ करण्यात येणार असून, २ लाखांपेक्षा जास्त थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांसाठी वन टाइम सेटलमेंट () ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ₹५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे अशी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती देण्यासाठी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी आज जालना येथे पत्रकार परिषद आयोजित केली. यावेळी आ. नारायण कुचे, कैलास गोरंट्याल, महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, संभाजी वारे, सुजित जोगस, सर्जेराव जाधव, शिवराज नारियलवाले यांची उपस्थिती होती. शेतकरी कर्जमाफी, वीजबिल माफी, मोफत वीज, सौर कृषी पंप आणि कृषी विकास योजनांच्या माध्यमातून राज्य शासनाने शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचे त्यांनी सांगितले. गुरुवार, जालना येथे ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या योजनेत सुरुवातीला १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदतीचे पीक कर्ज, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली कर्जे आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली कर्जे पात्र ठरविण्यात आली होती. त्यानंतर शासनाने आधार प्रमाणीकरण, ॲग्रीस्टॅक (फार्मर आयडी), ई-केवायसी आणि डिजिटल पडताळणीची अट लागू करून योजनेत पारदर्शकता वाढविली. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अटींमध्ये शिथिलता देऊन अतिरिक्त २३ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा केला आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. या योजनेचा जालना जिल्ह्यालाही मोठा लाभ होणार असून जिल्ह्यातील २ लाख ५ हजार १६२ शेतकऱ्यांना ₹२,१९१ कोटींच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. ही कर्जमाफी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना




आर्थिक स्थैर्य देणारी ठरणार असून शेतीसाठी नव्याने गुंतवणूक करण्यास मदत होईल, असा विश्वास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला आहे. राज्य शासनाने जालना जिल्ह्याला दिलेला हा निधी शेतकरी हितासाठी महत्त्वपूर्ण असल्याचेही आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले. यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या कार्यकाळात 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७' अंतर्गत ₹३४,०२२ कोटींची कर्जमाफी जाहीर करण्यात आली होती. या योजनेचा लाभ ४४ लाख ४ हजार शेतकऱ्यांना मिळाला. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ₹२,४२७ कोटींचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आले. ३० जून २०१६ पर्यंत थकीत असलेली पात्र कृषी कर्जे, ₹१.५० लाखांपर्यंतचे पीक कर्ज माफ करणे आणि सुविधा अशा महत्त्वाच्या तरतुदींमुळे ही योजना राज्यातील सर्वात मोठ्या कर्जमाफी योजनांपैकी एक ठरली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने ₹४८ हजार कोटींच्या कृषी पंप वीजबिल थकबाकी माफीची घोषणा केली असून त्याचा लाभ ३० लाख शेतीपंपधारक शेतकऱ्यांना मिळणार आहे. याशिवाय मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४ अंतर्गत ४७ लाख ४१ हजार कृषी पंपधारक शेतकऱ्यांना साडेसात एचपीपर्यंतच्या कृषी पंपासाठी मोफत वीज देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेसाठी २०२४-२५ मध्ये ₹११,१८५ कोटींची तरतूद करण्यात आली असून जालना जिल्ह्यात १ लाख ३८ हजार ४६४ शेतकरी आणि ₹२,४९५.५४ कोटींच्या वीजबिल माफीचा लाभ मिळणार असल्याची माहिती देण्यात आली असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले. कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन विकासासाठी राज्य शासनाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि जलयुक्त शिवार अभियान यांसारख्या योजनांनाही मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याचबरोबर 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेअंतर्गत राज्यात ६ लाख ६३ हजार ३२४ सौर कृषी पंप बसविण्यात आले असून, अवघ्या ३० दिवसांत ४५ हजार ९११ सौर पंप बसवून महाराष्ट्राने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान मिळविले आहे. पुढील पाच वर्षांत १० लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दिष्टही शासनाने निश्चित केले असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कल्याणाला केंद्रस्थानी ठेवून घेतलेल्या या निर्णयांमुळे महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा, स्थैर्य आणि विकासाची नवी संधी मिळाल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे. कर्जमाफी, वीजबिल माफी, मोफत वीज, सौर पंप, सिंचन आणि कृषी विकास योजनांच्या माध्यमातून राज्य शासनाने शेतकरी हिताचा सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारला असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे.

# पान १ वरून...

### पीक कर्जवाटपात राष्ट्रीयीकृत

समोर आली आहे. खासगी व लघुवित्त बँकांची कामगिरीही समाधानकारक नसून त्यांनी केवळ २३ टक्के लक्ष्य गाठले आहे. ग्रामीण बँकांनी ४५ टक्के कर्जवाटप केले असले तरी तेही अपेक्षेपेक्षा कमी मानले जात आहे. परिणामी राज्यातील पीक कर्ज वितरणाचा मोठा भार सहकारी बँकांवरच पडल्याचे चित्र आहे. दरम्यान, नाबार्डने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी राज्याची पीक कर्ज क्षमता २५,३७३ कोटी रुपये निश्चित केली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय बँकर्स समितीने एकूण ७५,४४१ कोटी रुपयांचे कृषी कर्जवाटपाचे लक्ष्य निश्चित केले आहे. त्यामध्ये खरीप हंगामासाठी ५२,५२२ कोटी रुपये, तर रब्बी हंगामासाठी २२,६२७ कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या मते, खरीप हंगामात वेळेत पीक कर्ज मिळणे हे उत्पादन वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे असते. कर्जवाटपात होणारा विलंब शेतकऱ्यांच्या पेरणी, खत, बियाणे व इतर कृषी निविष्ठांच्या खरेदीवर थेट परिणाम करतो. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँकांनी कर्ज वितरणाचा वेग वाढविणे आणि राज्य सरकारने नियमित आढावा घेऊन जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याची मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.ङ्गराज्य सरकारने निश्चित केलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी येत्या काही दिवसांत सर्व बँकांनी विशेष कर्जवाटप मोहीम राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. अन्यथा खरीप हंगामातील कर्जवाटपाचे उद्दिष्ट अपूर्ण राहण्याची आणि त्याचा थेट परिणाम कृषी उत्पादनावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

-------------

### आंदोलक पुन्हा

कालावधीत लागू राहतील. जंतर-मंतरवरील आंदोलनाचे वाढते स्वरूप पाहता, पुढील तीन महिने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दिल्ली पोलीस पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. मात्र ही परवानगी देण्यामागचे नेमके कारण अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आलेले नाही. नीट प्रश्नपत्रिका फुटीवरून अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनांमुळे राजधानीत सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली असतानाच हा आदेश आला आहे. कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील आंदोलक जंतरमंतरवर तळ ठोकून आहेत. या आठवड्याच्या सुरुवातीला आंदोलकांनी संसदेच्या दिशेने कूच करण्याचा प्रयत्न केला असता पोलीस आणि त्यांच्यात संघर्ष झाला होता. सोमवारी, हजारो आंदोलकांनी निर्बंध झुगारून संसदेच्या दिशेने कूच केले; त्यानंतर पोलिसांनी अश्रूधूर आणि लाठीमाराचा वापर करून जमावाला पांगवले. रस्ते अडवून निर्बंध लादले गेले असूनही, आंदोलकांनी गुरुवारी पुन्हा एकत्र येऊन परीक्षा पद्धतीत सुधारणा, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा आणि परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटीनंतर कथितरीत्या आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली. दरम्यान, दिल्ली पोलिसांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत अधिकारांचे त्रैमासिक नूतनीकरण ही एक नियमित प्रक्रिया आहे. तिचा सध्या सुरू असलेल्या आंदोलनाशी चुकीच्या पद्धतीने संबंध जोडला गेला आहे. हे नूतनीकरण निदर्शने सुरू होण्यापूर्वीच करण्यात आले होते. ती एक प्रमाणित प्रशासकीय प्रक्रिया आहे. नागरिकांना केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा.

-------------

### महाराष्ट्रात मान्सून

घाटमाथ्यावर अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता असल्याने हवामान विभागाने येथे 'रेड अलर्ट' जारी केला आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या पावसामुळे राज्यातील प्रमुख धरणे भरण्यास मदत होणार आहे. पावसाचे आगमन झाले असले तरी शेतकऱ्यांनी घाईघाईत पेरणी न करता, कृषी तज्ज्ञांचा योग्य तो सल्ला घेऊनच पेरणी करावी, असे आवाहन सानप यांनी केले आहे. तसेच हवामानाच्या अचूक आणि ताज्या माहितीसाठी नागरिकांनी भारतीय हवामान विभागाच्या 'मेघदूत' ॲपचा वापर करावा, असा सल्लाही त्यांनी दिला आहे. दुसरीकडे, अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे समुद्रात चक्रीय वाऱ्यांची स्थिती तयार झाली आहे. अरबी समुद्राकडून मोठ्या प्रमाणावर बाष्पयुक्त वारे किनारपट्टीच्या दिशेने येत असल्याने कोकण भागात पावसाचा जोर अधिक वाढला आहे. कोकणातील किनारपट्टी भागात मध्यम ते मुसळधार स्वरूपाचा पाऊस सुरू झाला असून, येत्या पाच दिवसांत या भागात पावसाच्या जोरदार सरी बरसण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मान्सूनच्या वाऱ्यांचा वेग वाढल्यामुळे किनारपट्टी भागात ताशी ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेता हवामान विभागाने रत्नागिरी जिल्ह्यासाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. गेल्या काही तासांपासून सतत पडणाऱ्या पावसामुळे कोकणातील काजळी, वाशिष्ठी आणि जगबुडी या नद्यांच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. नद्या पात्राबाहेर वाहण्याची आणि किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा सुटण्याची शक्यता असल्याने स्थानिक प्रशासनाने नागरिकांना आणि नदीकाठच्या रहिवाशांना योग्य ती खबरदारी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

------------

### विद्यार्थ्याला ड्रग्जची पावडर खिशात

देणाऱ्या पवन सांगळेला निलंबित केले आहे. महाराष्ट्र कॉँग्रेसच्या नेत्यांनी सुद्धा याच व्हीडीओवरून पोलिस महासंचालकांची भेट घेतली. ''अशा प्रकारे धमकावणाऱ्या पोलिसाला निलंबित करावे अशी आमची मागणी होती. पोलिसांनी ती मान्य केली. पोलिस ५० ग्रॅम पुडीची भाषा करतो. पोलिसच अमली पदार्थांचे रॅकेट चालवत आहेत का? कांडला बंदरातून हे ड्रग्ज येतात का? हा मोठा विषय आहे. हायकोर्टाच्या न्यायाधीशांच्या देखरेखीखाली याची चौकशी झाली पाहिजे'' अशी मागणी महाराष्ट्र कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

-------------

### शेतकऱ्यांच्या भावनांशी

खते मिळत नाहीत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळ करण्याचा प्रयत्न केला तर याद राखा, शेतकरी तडाखा दिल्याशिवाय सोडणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नोव्हेंबरमध्ये आश्वासन दिले होते की ३० जूनच्या आत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करु. याला आता आठ महिने झाले. प्रवीण परदेशी समिती आठ महिन्यांपूर्वी नेमली होती. कर्जमाफीसाठी नियम, निकष, अटी-शर्ती लावल्या. इतका वेळ घेऊन पहिल्या टप्प्यात केवळ ५३३ शेतकऱ्यांना पात्र ठरवता. ही चेष्टा थांबवा, असा टोला त्यांनी सरकारला लगावला. गेल्या आठ महिन्यांच्या कालावधीत राज्य सरकारने जिल्हा बँका आणि विविध कार्यकारी विकास सोसायट्यांकडून तब्बल ११ वेळा शेतकऱ्यांच्या कर्जाची माहिती गोळा केली. एवढी छाननी करूनही आठ महिन्यांनंतर पहिल्या दिवशी केवळ ५३३ शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली. एवढ्या संथ गतीने काम करून सरकारला कर्जमाफी द्यायची आहे की टाळाटाळ करायची आहे, असा सवालही त्यांनी केला.

-----------

### पेपरफुटीविरोधात ठाकरे

दावा त्यांनी केला. मात्र, सत्तेच्या अहंकारामुळे त्या सूचनांकडे दुर्लक्ष करण्यात आले, असे ते म्हणाले. त्यांच्या मते, आजचा वाद केवळ केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यापुरता मर्यादित राहिलेला नसून, तो केंद्र सरकारच्या नेतृत्वापर्यंत पोहोचला आहे. राज ठाकरे यांनी पंतप्रधानांच्या अलीकडील प्रतिक्रियेचाही उल्लेख करत, केवळ सोशल मीडियावर प्रतिक्रिया देण्यापेक्षा आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना चर्चेसाठी बोलावून त्यांची भूमिका समजून घेतली असती, तर परिस्थिती इतकी चिघळली नसती, असे मत व्यक्त केले. लोकांच्या भावना समजून घेण्याऐवजी आंदोलनाकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. लोकांचं ऐकण्याची तयारी नसणे हा सत्तेचा अहंकार असल्याची टीकाही त्यांनी केली. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून केंद्र सरकार आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असून या विषयावर देशातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

---------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६


## थोडक्यात



**बीड : धर्मदाय उप आयुक्त कार्यालय, बीड येथे आज स्व. अजितदादा पवार यांची जयंती साधेपणाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. धर्मदाय उप आयुक्त श्रीमती के. एस. जाधव यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत समाजसेवा, लोकहित आणि सार्वजनिक जीवनातील योगदानाचे स्मरण केले. यावेळी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याला उजाळा देत त्यांना विनम्र अभिवादन केले.**

### सुशील केकान यांनी उर्दू भाषेतून प्राप्त केली बीए ची पदवी !

बीड :- बीड तालुक्यातील खंडाळा गावचे रहिवासी, कवी, लेखक, प्राध्यापक तसेच उर्दू भाषेचे अभ्यासक म्हणून नावलौकिक असलेले सुशील केकान यांनी उर्दू विषयात बीए ची पदवी प्राप्त केली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ येथून त्यांनी ही पदवी प्राप्त केली. मे - जून २०२६ मध्ये झालेल्या परीक्षेत छत्रपती संभाजीनगर येथील मातोश्री कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालय या मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रातून त्यांनी ही पदवी प्राप्त केली असून केकान हे उर्दू भाषेतून बीए करणारे एकमेव पदवीधारक ठरले आहेत.



सुशील केकान हे सध्या अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर येथे श्री गाडगे महाराज कनिष्ठ कला व वाणिज्य महाविद्यालय येथे मराठी भाषेचे प्राध्यापक पदी कार्यरत आहेत.

सुशील केकान यांनी २०२४ मध्ये उर्दू भाषेतून आयसोलेटेड शालांत परीक्षा (१० वी) देखील उत्तीर्ण केली आहे. तसेच त्यांनी उर्दू शिकण्यासाठी 'उर्दू शिकूया' हे पुस्तक लिहिले आहे. या यशाबद्दल प्राचार्य हसन इनामदार, मित्र परिवार तसेच आप्तेष्ट यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

### अजितदादा यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिरात सहभागी व्हा : जयदत्त नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, माजलगाव मतदारसंघाच्या वतीने जनसेवा सप्ताह अंतर्गत दि.२४ जुलै शुक्रवार रोजी सकाळी १०:०० वाजता भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर माजलगाव येथील माँ वैष्णवी मंगल कार्यालय येथे होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष जयदत्त (अण्णा) नरवडे यांनी केले आहे.



या शिबिरासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संस्था तयारीला लागल्या असून कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. जनसेवा सप्ताहानिमित्त आयोजित या रक्तदान शिबिरातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्याचा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

# विशेष ग्रामसभेतून स्वइच्छेने पुनर्वसनासाठी पुढे येणाऱ्या कुटुंबांची इत्यंभूत माहिती गोळा करा -जिल्हाधिकारी

बीड / आष्टी । प्रतिनिधी

**कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलावामुळे बाधित होणाऱ्या गावांच्या पुनर्वसनाला आता गती देण्यात येत आहे. भुमि संपादन आणि पुनर्वसन कायद्यातील (२०१३) कलम १०८ नुसार प्रकल्पग्रस्तांना वाजवी भरपाई आणि सर्व आवश्यक सुविधा दिल्या जाणार आहेत. तरी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनी पुढाकार घेत गावच्या सरपंचांनी विशेष ग्रामसभा आयोजित करुन स्वइच्छेने पुनर्वसनासाठी पुढे येणाऱ्या कुटुंबांची इत्यंभूत माहिती गोळा करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत.**

आष्टी तालुक्यातील उपसा सिंचन योजना क्र. ३ मधील खुंटेफळ साठवण तलाव बाधित मौजे खुंटेफळ व कुंबेफळ येथील पुनर्वसन आणि पुनर्स्थापना योजनेच्या प्रारुप अहवालाचे पुनर्वलोकन (कलम १७ (१) अन्वये) करण्यासाठी आयोजित केलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहातील बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार सुरेश धस, उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख आणि बाधित गावांचे सरपंच, माजी सरपंच यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, महाराष्ट्रातील एकुण कृष्णा खोऱ्याच्या क्षेत्राच्या तुलनेत धाराशिव व बीड या मराठवाड्यामधील जिल्ह्यातील कृष्णा खोऱ्यातील क्षेत्र हे सर्व साधारण ८.३९ टक्के इतके आहे. कृष्णा मराठवाडा प्रकल्पाचे बांधकाम २ टप्प्यात करण्याचे नियोजित आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या प्रथम टप्प्याच्या मान्यतेनूसार खुंटेफळ साठवण तलावाची साठवण क्षमता १.६८ टीएमसी/ ४७.५७ द.ल.घ.मी. इतकी आहे. पर्यावरण मान्यतेनूसार खुंटेफळ साठवण तलावाचे काम हाती घेण्यात आले असून सद्यस्थितीत



**आमदार सुरेश धस यांचा पुनर्वसनासाठी पुढाकार, खुंटेफळ आणि कुंबेफळच्या पुनर्वसनाला गती, मे २०२८ पर्यंत पुनर्वसन प्रक्रिया होणार पूर्ण**

एकुण ५८ लक्ष घनमीटर मातीकामापैकी ४०.६० लक्ष घनमीटर म्हणजे ७० टक्के काम पुर्ण झालेले आहे. माती धरणाची उर्वरीत कामे व सांडव्याची कामे प्रगतीपथावर असून मार्च २०२७ पर्यंत भूसंपादनाची प्रक्रिया पुर्ण करुन सदर साठवण तलावाची घळभरणी करण्याचे नियोजित आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले. आमदार सुरेश धस यांनी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी पुढाकार घेतला. त्यांनी आष्टी तालुक्यातील मौजे खुंटेफळ (पुं) व मौजे कुंबेफळ या दोन्ही गावातील कुटुंबे, लोकसंख्या, रोजगार, शेती आणि ग्रामस्थांच्या अडीअडचणींची आदिची सविस्तर मांडली केली. गावकऱ्यांच्या हिताचा विचार करून, प्रत्येक कुटुंबाची लोकसंख्येनुसार अचुक माहिती गोळा करण्यास त्यांनी सहमती दर्शविली. या बैठकीमुळे या दोन्ही गावांचा पुनर्वसनाचा प्रश्न आता वेगाने आणि नियोजित पद्धतीने सुटण्यास मोठी मदत होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

बुडीत क्षेत्रात बाधित होणाऱ्या आष्टी तालुक्यातील मौजे खुंटेफळ पुंडी, कुंबेफळ, बाळेवाडी व सोलापूरवाडी व पुंडी या एकुण ५ गावापैकी मौजे खुंटेफळ पुंडी व मौजे कुंबेफळ या दोन गावांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. मौजे खुंटेफळ पुंडी या गावची लोकसंख्या १२३० असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुटुंबाची संख्या ६१२ अशी आहे. तर मौजे कुंबेफळ या गावची लोकसंख्या १०४९ असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुटुंबाची संख्या ४३७ अशी आहे. तर मौजे खुंटेफळ पुंडी या गावात अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या १०८ असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुटुंबाची संख्या ६२ अशी आहे. तसेच मौजे कुंबेफळ या गावात अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या १३६ असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुटुंबाची संख्या ७० अशी आहे. पुनर्वसन व पुनर्स्थापना प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी पाटोदा यांच्यामार्फत बाधित क्षेत्रात आवश्यक सर्वेक्षण करण्यात आले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता आष्टी तालुक्यातील मौजे कुंबेफळ येथील गायरान जमीन गट नं ६० येथील क्षेत्र ३२.०२ हे. आर जमिनीची निवड करण्यात आली आहे. तर मौजे खुंटेफळसाठी मौजे वाहिरा येथील जमीन गट नं ४३, ४७ येथील क्षेत्र ४४.०० हे. आर. व मौजे सोलापूरवाडी येथील जमीन गट नं. १० क्षेत्र ४४.०० हे. आर. जमिनीची स्थळ पाहणी, जागा निश्चिती समितीमार्फत प्रस्तावित आहे. तसेच नगर रचना विभागाकडून मान्यताप्राप्त लेआउटनुसार आणि स्वेच्छा पुनर्वसनाच्या कार्यवाहीस अधीन राहून प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप केले जातील. तसेच सर्व नागरी सुविधा पुरवून मे २०२८ पर्यंत पुनर्वसनाची संपूर्ण कार्यवाही पूर्ण करण्याचे प्रशासनाने ठरविले आहे.

## नीट २०२६ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा पाटोद्यात भव्य सत्कार ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव; पालकांचाही सन्मान

पाटोदा । प्रतिनिधी

नीट-२०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून वैद्यकीय शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या पाटोदा तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा बुधवारी (दि. २२ जुलै) पाटोदा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. गणेश कवडे यांच्या विशेष पुढाकारातून आणि मराठी पत्रकार परिषद, पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचाही सन्मान करण्यात आला.

ग्रामीण व शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळविलेल्या उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा सन्मान होण्याबरोबरच इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.



यावेळी पांडुरंग संदीपान वाळेकर (६२६ गुण), प्रणव नितीन बामदळे (५७५ गुण) आणि मोनिका लक्ष्मण भाकरे (५२७ गुण) यांनी नीट परीक्षेत मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अप) पाटोदा तालुका प्रमुख दिपक दादा घुमरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे आनंद जाधव, ज्येष्ठ नेते गुलाबराव घुमरे, शाम हुले यांची प्रमुख उपस्थित होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश कवडे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात दिपक दादा घुमरे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या बळावर मिळविलेल्या यशाचे कौतुक करत भविष्यातही अशा गुणवंतांचा सन्मान होत राहावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी गुलाबराव घुमरे, शाम हुले, शेख इमाननूर, शेख जुनेद तसेच मराठी पत्रकार परिषद तालुका अध्यक्ष अजय जोशी यांनी मनोगत व्यक्त करून गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या उज्ज्वल भवितव्यास शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास पत्रकार सतीश गर्जे, हमीद पठाण, जावेद शेख तसेच विद्यार्थ्यांचे पालक लक्ष्मण भाकरे, नितीन बामदळे, रमेश जाधव, संदीपान वाळेकर,विठ्ठल नाईकवाडे मामा,सरफराज सय्यद (गुड्डू), रियाज सिद्दीकी बबलु घुमरे, बाबु शेख,यांच्यासह मोठ्या संख्येने पालक, नागरिक आणि पत्रकार उपस्थित होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करणारा हा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

पान ६ वरुन...

### धर्मेंद्र प्रधान, सदाभाऊ खोत

राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, महाराष्ट्राचे राज्यपाल तसेच मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना निवेदन पाठविण्यात आले.या आंदोलनातसेवा सोसायटीचे चेअरमन रविबापू निर्मळ, अँड.गणेश वाणी, सुरेश निर्मळ ,शिवशक्ती भिमशक्ति विचारमंचचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, संतोष भोसले, सर्पमित्र अशोक जाधव, ज्ञानेश्वर कुदळे,सुंदर येडे,सोमीनाथ आमटे, सिताराम थोरात, रामहरी चाळक, गुलाब कांबळे,नाना निर्मळ, अमोल निर्मळ, अशोक गोंडे, रामचंद्र मुळे आदी सहभागी होते.

### पेपर लीक बंद करा

भविष्य वाचवा अशा घोषणा दिल्या.सर्व व्यापार्यांनी आपापली दुकाने बंद ठेवली.या आंदोलनात विविध सामाजिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणण्याची, पेपरफुटीच्या घटनांवर कठोर कारवाई करण्याची आणि जबाबदारांवर योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली.

### बीडमध्ये २ ऑगस्टला

बीड महसूल उपविभागाकडून 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' राबविण्यात येत आहे.

राज्यात विधानसभा मतदारसंघनिहाय 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांचे' आयोजन करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. त्यानुसार बीड विधानसभा मतदारसंघासाठी बीड शहरातील अंबिका लॉन्स येथे रविवार, दि.२ ऑगस्ट रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या नियोजनासाठी बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. यावेळी महसूल मंत्र्यांकडून निमंत्रित असलेले भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, महादेव चौरे तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, महसूल विभागाच्या नियोजनातून हा उपक्रम राबविण्यात येत असून अशा लोकाभिमुख शिबिरांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. शासनाच्या विविध सेवा आणि लोककल्याणकारी योजनांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अशा शिबिरांची भूमिका महत्त्वाची आहे. नागरिकाभिमुख प्रशासनाची संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी शासन, प्रशासन आणि जनतेतील समन्वय व विश्वास अधिक दृढ करणारे हे शिबीर ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नागरिकांनी शासनाच्या विविध योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

**नागरिकांच्या तक्रारींची दखल**

बैठकीदरम्यान शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध तक्रारींची डॉ. योगेश क्षीरसागर यांनी दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश देत त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला अधिक कार्यक्षमतेने काम करण्याच्या सूचना केल्या. त्यामुळे अनेक रखडलेल्या प्रशासकीय कामांना गती मिळून नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### महिलेच्या सततच्या मानसिक

सांगून फोन कट केला. ही बातमी ऐकताच भांडवलकर कुटुंबीयांच्या पायाखालची जमीन सरकली. त्यांनी तातडीने गाडी करून लातूर गाठले. श्रीनगर भागातील खोलीत पोहोचले असता प्रकाश हे जमिनीवर मृतावस्थेत आढळले. उपस्थितांच्या आणि पोलिसांच्या मदतीने मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला.

आरोपी महिला रुपाली अंधारे अखेर पोलिसांच्या जाळ्यात

आपला ४१ वर्षांचा तरुण मुलगा गमावल्यानंतर सोनीजवळा येथील ६५ वर्षीय वृद्ध पिता नानासाहेब मनोहर भांडवलकर यांच्या अश्रूंचा बांध फुटला होता. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून लातूरच्या एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात आरोपी महिला रुपाली गरड उर्फ रुक्मिणी सुधीर अंधारे हिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (इछड) गंभीर कलमांन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करणारे पोलीस उपनिरीक्षक (झडख) अजय पाटील यांनी माहिती दिली की, आत्महत्यूस प्रवृत्त करणाऱ्या आरोपी महिला रुपाली अंधारे हिला पोलिसांनी शोध घेऊन तात्काळ अटक केली असून, तिची पोलीस कोठडीत चौकशी सुरू आहे.

## ना. पंकजाताई मुंडे यांनी मानले आभार ; परळीतील नवीन पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालयाला शासनाची १३ हेक्टर जमीन विनामूल्य

मुंबई । प्रतिनिधी

परळी येथे नव्याने होत असलेल्या पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय उभारण्यासाठी १३ हेक्टर शासकीय जमीन विनामूल्य देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून तसा शासन आदेश महसूल व वन विभागाने निर्गमित केला आहे. दरम्यान या निर्णयाबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांचे आभार मानले आहेत.

परळीच्या सर्व्हे क्रमांक ४७८ मधील १३ हेक्टर शासकीय जमीन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना 'भोगवटादार वर्ग-२' या अटीवर विनामूल्य व महसूलमुक्त स्वरूपात हस्तांतरित करण्यात येणार आहे. महसूल विभागाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४० तसेच संबंधित नियमांनुसार ही जमीन प्रदान करण्यास मान्यता दिली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने या जमिनीच्या वापराबाबत काही महत्त्वपूर्ण अटी घातल्या आहेत. ताबा मिळाल्यानंतर तीन वर्षांच्या आत या जमिनीवर प्रस्तावित पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे काम प्रत्यक्ष सुरू करणे बंधनकारक राहील. तसेच ही जमीन केवळ पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठीच वापरता येईल. जमीन विक्री, हस्तांतरण, देणगी किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी वापरण्यास परवानगी राहणार नाही. दरम्यान या शासन आदेशामुळे परळीतील नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय उभारण्यास आता मोकळीक मिळाली असून जागेचा प्रश्न सुटला आहे. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार पशुवैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतानाच पशुपालन क्षेत्राला सक्षम मनुष्यबळ मिळावे, हा या निर्णयामागील उद्देश आहे असे ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-७४८ दिनांक ०८/०७/२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **डिगांबर मधुकर घुले रा.कानडगाव ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वतःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | डिगांबर मधुकर घुले | स्वतः | १७/०५/१९५९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## कायदे विभागाच्या माजलगाव विधानसभा अध्यक्षपदी अ‍ॅड कुंभार तर तालुकाध्यक्षपदी अ‍ॅड.मिसाळ यांची नियुक्ती

माजलगाव । प्रतिनिधी

शिवसेना पक्षाच्या कायदे विभाग संघटनेच्या माजलगाव विधानसभा अध्यक्षपदी अँड. महेश शिवलिंग कुंभार तर माजलगाव तालुकाध्यक्षपदी अँड गौतम मिसाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र दि. २१ जुलै २०२६ रोजी देण्यात आले .

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने तसेच शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्तीनंतर अँड. महेश शिवलिंग कुंभार आणि अँड गौतम मिसाळ यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या शिकवणीचा प्रचार-प्रसार करण्याबरोबरच शिवसेना पक्ष व कायदे विभाग संघटनेच्या बळकटीसाठी सर्वांना सोबत घेऊन कार्य करण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. नियुक्तीपत्रात प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाचा लेखी अहवाल बाळासाहेब भवन कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याची सूचनाही करण्यात आली आहे.



ही नियुक्तीपत्रे शिवसेना कायदे विभागाचे अध्यक्ष ऑड. हेमंत केंजाळकर व सचिव ऑड अनिल दळवी यांच्या स्वाक्षरीने शिवसेनेचे सचिव संजय मोरे,मंत्री भारत गोगावले, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांच्या उपस्थितीत देण्यात आले ऑड. महेश शिवलिंग कुंभार आणि अँड गौतम मिसाळ यांच्या नियुक्तीबद्दल शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

पान ६ वरुन...

### जि.प. शाळा, अंगणवाडीच्या

आल्याने नागरिकांना व विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे.सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने साचलेला कचरा, घाण व दुर्गंधीमुळे रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. शाळा व अंगणवाडी परिसरात लहान मुले ये-जा करत असताना अशा प्रकारे कचरा टाकणे हे त्यांच्या आरोग्याशी खेळण्यासारखेच आहे. ग्रामपंचायतीने तातडीने या ठिकाणी साचलेली घाण व कचरा हटवून परिसराची स्वच्छता करावी. तसेच नागरिकांनीही आपली सामाजिक जबाबदारी ओळखून शाळा व अंगणवाडी परिसरात कचरा टाकू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीने याबाबत नागरिकांना स्पष्ट सूचना देऊन कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी पालक व नागरिकांतून होत आहे.

### बीड पोलिसांची धडक

(रा. कुरनेनगर, ता. जि. धाराशिव) ५) महेश शिवाजी पवार (रा. मोहा, ता. कळंब)६) अशोक हिंमत शिंदे (रा. मोहा, ता. कळंब) गुन्ह्यांची कबुली आणि जप्त मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींची कसून चौकशी केली असता, त्यांनी धारूर तालुक्यातील आडस येथील आखाड्यावर झोपलेल्या इसमाला मारहाण करून १२ शेळ्या चोरल्याची कबुली दिली. तसेच केज येथील कानडी माळी आणि मस्साजोग येथील सोलार प्लांटमधून आर्थिंग रॉड व वायर चोरी केल्याचे सांगितले. याशिवाय आपल्या साथीदारांसह नेकनूर हद्दीतील येळंबघाट येथे रात्रीच्या वेळी घरफोडी केल्याची कबुलीही त्यांनी दिली आहे. पोलिसांच्या पथकाने आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यासाठी वापरण्यात आलेले हत्यार, वाहन आणि इतर असा एकूण ६,७९,४००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची धडक कारवाई पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विघ्ने, पोहवा बप्पासाहेब घोडके, जफर पठाण, दिलीप गित्ते, भागवत शेलार, दिपक खांडेकर, अर्जुन यादव, मपोहवा मुंढे, पोलीस अंमलदार अश्वीनकुमार सुरवसे आणि चापोहवा गणेश मराडे यांनी पार पाडली आहे.

## जिल्हास्तरीय 'मेरा युवा भारत' नशामुक्त भारत अभियान स्पर्धांचे भव्य आयोजन

बीड । प्रतिनिधी

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत 'मेरा युवा भारत ' आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन दि. २८ जुलै २०२६ रोजी श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड येथे करण्यात आले आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवक-युवतींमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, समाजात सकारात्मक संदेश पोहोचविणे आणि निरोगी, सक्षम भारत घडविण्यासाठी युवकांचा सहभाग वाढविणे हा आहे. स्पर्धेमध्ये १६ ते २९ वर्षे वयोगटातील सर्व युवक-युवती वैयक्तिक किंवा गट स्वरूपात सहभागी होऊ शकतात. इच्छुकांनी चध इहरीरीं पोर्टलवर नोंदणी करून ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.या जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये खालील आठ प्रकारांचा समावेश आहे -लोकगीत गायन स्पर्धा

नृत्य स्पर्धापथनाट्य / नुक्कड नाट्य स्पर्धाचित्रकला स्पर्धावादविवाद स्पर्धालघुपट / रील स्पर्धाघोषवाक्य लेखन स्पर्धास्लॅम पोएट्री स्पर्धास्पर्धेतील विजेत्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावर बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार असून आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्रेही प्रदान करण्यात येणार आहेत.अधिक माहितीसाठी ९४२३४७०४३७.मादक पदार्थांना नकार द्या, स्वप्नांना होकार द्या! या संदेशासह जिल्ह्यातील सर्व पात्र युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन नशामुक्त, निरोगी आणि विकसित भारताच्या निर्मितीत योगदान द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


# 'एल निनो' मार्च २०२७ पर्यंत कायम राहण्याची शक्यता

## अमेरिकेच्या सीपीसीच्या अहवालाने चिंता वाढली

न्युयॉर्क / वृत्तसंस्था

अमेरिकेच्या 'नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशन' (एनओएए)च्या क्लायमेट प्रेडिक्शन सेंटर (सीपीसी)ने एल निनोबाबत महत्त्वाचा इशारा दिला आहे. ताज्या अहवालानुसार, सध्या सुरू झालेला एल निनो वर्षअखेरीपर्यंत अधिक बळकट होण्याची शक्यता असून, २०२७ च्या मार्चपर्यंत तो कायम राहण्याची तब्बल ९७ टक्के शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

अहवालानुसार, ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६ या कालावधीत तीव्र 'एल निनो' विकसित होण्याची ८१ टक्के शक्यता आहे. तर अति तीव्र एल निनोऐवजी तुलनेने कमकुवत एल निनो राहण्याची शक्यता सुमारे २० टक्के असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सीपीसीच्या अहवालानुसार, एल निनोची परिस्थिती आता पूर्णपणे प्रस्थापित झाली आहे. विषुववृत्तीय मध्य आणि पूर्व प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठीय तापमान सरासरीपेक्षा जास्त झाले असून, वातावरणातील बदलही एल निनोशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. ऑगस्ट २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विषुववृत्तीय प्रशांत



महासागरातील बहुतांश भागात समुद्रपृष्ठीय तापमान सरासरीपेक्षा कमी होते. मात्र, एप्रिल २०२६ च्या मध्यापासून पूर्व-मध्य आणि पूर्व प्रशांत महासागरातील तापमानात सातत्याने वाढ होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. गेल्या चार आठवड्यांत डेट लाइनपासून पूर्व प्रशांत महासागरापर्यंत समुद्रपृष्ठीय तापमान सरासरीपेक्षा जास्त नोंदवले गेले, तर डेट लाईनच्या पश्चिमेकडील भागात तापमान तुलनेने कमी राहिले. अहवालानुसार, पूर्व विषुववृत्तीय अटलांटिक महासागरात तापमान सरासरीपेक्षा कमी, तर पश्चिम आणि पूर्व हिंद महासागरात समुद्रपृष्ठीय तापमान सरासरीपेक्षा जास्त नोंदवले गेले आहे. तसेच, डेट लाइनपासून पूर्व प्रशांत महासागरापर्यंत सकारात्मक तापमान विचलन आणखी बळकट झाले आहे. विषुववृत्ताच्या उत्तरेकडील पूर्व प्रशांत महासागरातही

### समुद्राखालील तापमानात बदल

'एनओएए'च्या अहवालानुसार, २०२५ च्या जुलैपासून डिसेंबरपर्यंत समुद्राखालील तापमान सरासरीपेक्षा कमी होते. त्यानंतर डिसेंबर २०२५ च्या मध्यापासून सकारात्मक तापमान विचलन सुरू झाले आणि एप्रिल २०२६ अखेरपर्यंत त्यात सातत्याने वाढ झाली. एप्रिलच्या अखेरीपासून मेच्या अखेरपर्यंत ही तीव्रता काहीशी कमी झाली होती. मात्र, मे २०२६ च्या अखेरीपासून पुन्हा समुद्राखालील तापमान वाढू लागले असून, गेल्या दोन महिन्यांत विषुववृत्तीय प्रशांत महासागराच्या बहुतांश भागात समुद्राखालील तापमान सरासरीपेक्षा जास्त राहिले आहे.

सरासरीपेक्षा जास्त तापमान सातत्याने वाढत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. अहवालात पृथ्वीवरून अवकाशात उत्सर्जित होणाऱ्या दीर्घतरंगीय उष्णता प्रारण (ओएलआर)मधील बदलांचाही उल्लेख करण्यात आला आहे.

जून २०२६ पासून इंडोनेशिया परिसरात सकारात्मक ओएलआर विचलन कायम असून, याचा अर्थ त्या भागात ढगनिर्मिती आणि पावसाचे प्रमाण कमी राहिले आहे. याउलट, मध्य आणि पूर्व-मध्य विषुववृत्तीय प्रशांत महासागरात नकारात्मक ओएलआर विचलन दिसून आले असून, तेथे ढगनिर्मिती आणि पर्जन्यमान वाढल्याचे संकेत आहेत.

या निर्देशांकाच्या आधारे वातावरणातील ढगनिर्मिती आणि पावसाच्या प्रक्रियेचा अंदाज घेतला जातो. एकूणच, 'एनओएए'च्या ताज्या अहवालानुसार पुढील काही महिन्यांत एल निनोची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे जगातील अनेक भागांप्रमाणेच भारतातील मॉन्सून, तापमान आणि शेतीवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

# कपास क्रांती अंतर्गत उत्पादकता प्रशिक्षण संपन्न

शिरूर । प्रतिनिधी

केद्रशासनाच्या कपासक्राती योजना अतर्गत हिवरसिंगा येथील कापूस उत्पादक शेतकरी गटातील सभासद शेतकऱ्यांना महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या कापूस उत्पादकता अभियान (कपास क्रांती) अंतर्गत मौजे हिवरसिंगा येथे कापूस पिक पद्धतीवर आधारित औषधे फवारणी खते या विषयी शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम श्रीनिवास सार्वजनिक वाचनालय हिवरसिगा यांच्या सभागृहात सपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. कुडलिक सानप हे होते तर प्रमुख अतिथी श्री. गागर्डे सर ( ता. कृ. अधिकारी शिरूर) श्री. संजय फरताडे ( मंडळ कृषी अधिकारी ) श्री. थिटे सर ( नूजीवीड सिड्स) श्री. मिसाळ सर, श्री.दत्तात्रय शिंदे (मा. सरपंच) श्री. माऊली शिंदे, शिवराम राऊत. हे होते.कार्यक्रमामध्ये कापूस पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी स्पेसिंग पद्धत, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य (खत) व्यवस्थापन, वाढ नियंत्रण तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. यावेळी तालुका कृषी अधिकारी, शिरूर कासार श्री. गांगडे साहेब यांनी अती घन लागवड व क्लोज स्पेसिंग पद्धतीचे फायदे स्पष्ट करून अधिक उत्पादनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. न्यूजीवीड कंपनीचे श्री. थिटे यांनी खत व्यवस्थापन व वाढ नियंत्रणाबाबत मार्गदर्शन केले. श्री. ज्ञानेश्वर मिसाळ तसेच उप कृषी अधिकारी श्री. फरतडे साहेब यांनी कापूस पिकातील प्रमुख किडी व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन याविषयी सखोल माहिती दिली. या प्रशिक्षणास मा. सरपंच, ग्रामस्थ, शेतकरी लाभार्थी तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून कापूस उत्पादन वाढविण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी प्रभाकर सानप, प्रभाकर डोगरे, सतिश दुधाळ,भिमराव सानप, भागवत दुधाळ, अलिम शेख, नवनाथ बडे, भानुदास शिंदे, गोकुळ शिंदे, रामेश्वर पाडूळे, सिद्धेश्वर दुधाळ, कल्याण दुधाळ, जालिंदर राऊत, शाम दुधाळ, कृष्णा शिंदे,सह शेतकरी गटातील सभासद शेतकरी याची उपस्थिती होती. यावेळी अभार श्री. सदिपान जाधव कृषिसहाय्यक यांनी व्यक्त केले.



# टोमॅटो पिकातील जिवाणूजन्य मर रोगाची लक्षणे आणि उपाय

राज्यात सध्या टोमॅटो पिकामध्ये जिवाणूजन्य मर रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. हा रोग एकदा शेतात आल्यास अतिशय वेगाने पसरतो आणि काही दिवसांत मोठ्या प्रमाणात झाडे वाळण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी रोगाची सुरुवातीची लक्षणे ओळखून तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.



रोगाची लक्षणे : या रोगाचे जिवाणू जमिनीत राहून मुळांद्वारे झाडात प्रवेश करतात. सुरुवातीला झाड हिरवेगार असतानाच दुपारच्या उन्हात कोमेजते, तर संध्याकाळी पुन्हा ताजेतवाने दिसते. मात्र काही दिवसांत संपूर्ण झाड वाळते. फ्युजेरियम मर रोगात पाने पिवळी पडतात, तर जिवाणूजन्य मर रोगात पाने हिरवी असतानाच झाड मरते, हे या रोगाचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे. रोगग्रस्त खोड कापल्यास आतील भाग तपकिरी दिसतो. तसेच खोडाचा तुकडा स्वच्छ पाण्यात ठेवल्यास त्यातून पांढऱ्या दोऱ्यासारखा चिकट द्राव बाहेर येतो.

रोगाचा प्रसार : पीक वाढीच्या कोणत्याही अवस्थेत हा रोग होऊ शकतो. मात्र फळधारणेच्या काळात प्रादुर्भाव अधिक आढळतो. रोगग्रस्त झाडांवरील फळे आकसतात, त्यांचा दर्जा खालावतो आणि उत्पादनात घट येते. सिंचनाचे पाणी, शेतीची अवजारे तसेच मुळांना झालेल्या जखमांमधून या रोगाचा प्रसार होतो.

प्रतिबंधात्मक उपाय : या रोगावर पूर्ण नियंत्रण मिळवणे कठीण असल्याने प्रतिबंधात्मक उपाय महत्त्वाचे आहेत. सलग टोमॅटो, वांगी, मिरची किंवा बटाटा घेणे टाळून मका, ज्वारी किंवा झेंडू यांसारख्या पिकांचा फेरपालट करावा. शेतात पाणी साचू देऊ नये. लागवडीपूर्वी रोपांची मुळे स्यूडोमोनास फ्लुरोसन्स १० मिली प्रति लिटर पाणी या द्रावणात अर्धा तास बुडवावीत. तसेच कुजलेल्या शेणखतात ट्रायकोडर्मा मिसळून जमिनीत वापर करावा.

फवारण्या कोणत्या? : रोगाची सुरुवात दिसताच स्ट्रेप्टोमायसिन सल्फेट ९० टक्के + टेट्रासायक्लीन हायड्रोक्लोराइड १० टक्के एसपी हे औषध ४० ते १०० पीपीएम प्रमाणात पाण्यात मिसळून झाडांच्या बुंध्याजवळ आळवणी करावी. रोगग्रस्त झाडे मुळासकट काढून नष्ट करावीत आणि त्या जागी कॉपर ऑक्सिक्लोराईड द्रावणाचा वापर करावा. तसेच शेतीची अवजारे दुसऱ्या शेतात वापरण्यापूर्वी स्वच्छ धुण्याची काळजी घ्यावी.

# विषारी सुरवंटांच्या प्रादुर्भावाने पिकांवर दुष्परिणाम

हवामान बदलाचे परिणाम दिवसेंदिवस अधिक तीव्र होत असून, त्याचे विविध स्वरूपात दुष्परिणाम दिसून येत आहेत. अतिवृष्टी, दुष्काळ, कमी कालावधीत जास्त पाऊस अशा घटना सातत्याने होताना दिसत आहेत. यासोबतच ऋतुचक्र बिघडल्याने कीड-रोगांच्या प्रादुर्भावासाठी पोषक हवामान उपलब्ध होऊन त्यांची तीव्रता दिवसेंदिवस वेगाने वाढत आहे. याचेच एक उदाहरण यावर्षी युरोपातील अनेक देशांमध्ये विषारी केसाळ सुरवंटांच्या (ओक प्रोसेशनरी कॅटरपिलर) रूपाने पाहायला मिळत आहे.

साधारणपणे दरवर्षी जाणविणारा या विषारी केसाळ सुरवंटांचा प्रादुर्भाव यंदा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या वर्षी उद्रेक वाढण्यामागे हवामान बदल हे मुख्य कारण असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. युरोपमध्ये गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे हिवाळा सौम्य आणि तुलनेने उबदार होत असल्याने या सुरवंटाची अंडी अधिक सुरक्षित राहत आहेत. पुढे वसंत ऋतू सुरू होताच या अंड्यांतून सुरवंट अधिक प्रमाणात बाहेर पडू लागतात. यासोबतच या काळात ओक वृक्षांना कोवळी पाने फुटत असल्याने सुरवंटांना मुबलक अन्न उपलब्ध होते. त्यामुळे त्यांची वाढ, जिवंत राहण्याचे प्रमाण आणि प्रजनन यशस्वी होऊन काहीच आठवड्यांत त्यांची संख्या झपाट्याने वाढते. या वर्षी मे महिन्याच्या अखेरीस सुरू झालेला हा प्रादुर्भाव जून-जुलैमध्ये अधिक तीव्र स्वरूपात दिसून आला. जर्मनीनंतर पुढे नेदरलँड्स, बेल्जियम आणि इंग्लंडमध्येही प्रादुर्भाव जाणवण्यास सुरुवात झाली. एकूणच, हवामान बदलामुळे कीटकांचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे हे उदाहरण असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे. भविष्यात अशा संकटांना सामोरे जाण्यासाठी पर्यावरणीय उपाययोजना आणि सजगता अत्यावश्यक ठरणार आहे.



हा सुरवंट नेमका कोणता? : हा ओक प्रोसेशनरी मॉथ या पतंगाचा अळी अवस्थेतील सुरवंट आहे. तो प्रामुख्याने ओक वृक्षांवर आढळून येतो. शेकडोंच्या संख्येत समूहाने एकामागून एक रांगेत चालत जाणे, ही या सुरवंटाची सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे. त्यामुळे त्यांना 'प्रोसेशनरी कॅटरपिलर' असे नाव पडले आहे. हे सुरवंट दिवसा झाडांच्या खोडावर किंवा फांद्यांवर रेशमी घरट्यांमध्ये लपून बसतात, तर रात्री पाने खाण्यासाठी बाहेर पडतात.

प्रादुर्भाव वाढण्यामागील कारणे : पर्यावरणीय अभ्यासकांच्या मते, या वर्षी उबदार वसंत ऋतू आणि सौम्य हिवाळा अशी हवामान स्थिती होती. ही स्थिती या सुरवंटांना अंडी घालण्यास आणि त्याचे फलन होण्यास अधिक पोषक ठरली. सुरुवातीला मे महिन्याच्या अखेरीस झाडांवर काही प्रमाणात दिसू लागलेले सुरवंट पुढे जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हजारोंच्या संख्येने दिसू लागले. ओक वृक्षांवर या सुरवंटांनी वसाहती निर्माण केल्या आणि पुढे त्यांनी वेगाने ओक वृक्षांची पाने खाण्यास सुरुवात केली.

जीवनचक्र : अंडी सुरवंट (सर्वाधिक धोकादायक अवस्था) कोष पतंग पुन्हा अंडी. ओक प्रोसेशनरी मॉथ हा पतंग उन्हाळ्याच्या अखेरीस (जुलै-ऑगस्ट) ओक वृक्षांच्या फांद्यांवर अंडी घालतो. ही अंडी संपूर्ण हिवाळा ऋतूमध्ये झाडावरच राहतात. मागील काही वर्षांपूर्वी कडक थंडी आणि दीर्घ हिमवृष्टी अशा हवामानात सुरवंटांनी घातलेल्या अंड्यांपैकी मोठ्या प्रमाणात अंडी नष्ट होत असत किंवा त्यातून बाहेर पडणाऱ्या अळ्यांचे प्रमाण कमी होते. मात्र मागील काही वर्षात हवामान बदलामुळे अंडी सुरक्षित राहणे आणि त्यातून सुरवंट बाहेर पडण्याची संख्या झपाट्याने वाढत गेली. या सुरवंट अवस्थेत त्यांच्या शरीरावर विषारी सूक्ष्म केस असतात. त्यामुळे ही अवस्था माणसे, प्राणी आणि वनसंपदेसाठी सर्वाधिक धोकादायक मानली जाते. या सुरवंटांच्या नियंत्रणासाठी युरोपातील अनेक देशांनी विशेष कृती आराखडा तयार केला आहे. जर्मनीत प्रशिक्षित पथकांच्या मदतीने संरक्षक पोशाख, चेहऱ्यावर मास्क परिधान करून औद्योगिक व्हॅक्यूम यंत्रांच्या साह्याने या सुरवंटाचे झाडांवरील अधिवास नष्ट केले जात आहेत. काही भागांत जैविक नियंत्रणासाठी या जिवाणूवर आधारित जैविक कीटकनाशकाची फवारणी केली जात आहे. तर अनेक ठिकाणी फेरोमोन सापळ्यांच्या मदतीने पतंगांच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे.

आरोग्यावर गंभीर परिणाम : या सुरवंटांमुळे भीती निर्माण होण्याचे कारण त्यांचा आकार नाही, तर त्यांच्या अंगावरील सूक्ष्म विषारी केस आहेत. प्रौढ अवस्थेतील प्रत्येक सुरवंटाच्या शरीरावर हजारो सूक्ष्म विषारी केस असतात. या केसांमध्ये थॉमेटोपोईन नावाचे विषारी प्रथिन असते. त्यामुळे ते सहज तुटून वाऱ्याबरोबर हवेत पसरतात. हे केस मानवी त्वचेच्या संपर्कात आल्यास तीव्र खाज, पुरळ, डोळ्यांची जळजळ, घशात खवखव आणि श्वसनाचा त्रास होऊ शकतो. दमा असलेल्या व्यक्तींमध्ये त्याचे अधिक गंभीर परिणाम दिसून येतात. शिवाय सूक्ष्म विषारी केसांमुळे पाळीव प्राणीदेखील आजारी पडू शकतात, ही बाब समोर आली आहे. कुत्री, मांजर, घोडे आणि इतर पाळीव प्राणी सुरवंट असलेल्या झाडांजवळ गेल्यास त्यांना त्वचेची जळजळ, नाक-तोंडाची सूज किंवा श्वसनाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे अनेक ठिकाणी उद्यानांमध्ये पाळीव प्राणी नेण्यावर देखील काही काळ निर्बंध घालण्यात आले आहेत.

वनसंपदेलाही मोठा फटका : या सुरवंटांचा प्रादुर्भाव केवळ आरोग्यापुरता मर्यादित नाही. हे सुरवंट समुहाने ओक वृक्षांवर हल्ला चढवून त्याची पाने खातात. त्यामुळे झाडे पर्णहीन होऊन त्यांची वाढ मंदावते. सलग काही वर्षे प्रादुर्भाव राहिल्यास संपूर्ण ओक जंगलांच्या परिसंस्थेवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असल्याची भीती वन अभ्यासकांकडून व्यक्त केली जात आहे.




## महत्वाच्या घटना

१५६७ : स्कॉटलंडची राणी मेरी पदच्युत झाल्यामुळे १ वर्षाचा जेम्स (सहावा) स्कॉटलंडच्या राजेपदी विराजमान झाला.
१७०४ : ब्रिटनने जिब्राल्टरचा ताबा घेतला, जो आजपर्यंत सोडलेला नाही.
१८२३ : चिलीमधे गुलामगिरीची प्रथा समाप्त झाली.
१८७० : अमेरिकेमध्ये देशांतर्गत रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.
१९३१ : पिटसबर्ग, पेनसिल्व्हानिया येथील एका वृद्धाश्रमास आग लागुन ४८ लोक मृत्यूमुखी पडले.
१९३२ : रामकृष्ण मिशन मठाची स्थापना करण्यात आली.
१९४३ : दुसरे महायुद्ध ऑपरेशन गोमोरा दोस्त राष्ट्रांनी जर्मनीतील हॅम्बर्ग शहरावर तुफानी बॉम्बहल्ले सुरू केले. हे हल्ले पुढील आठ दिवस सुरू होते. या हल्ल्यांना हॅम्बर्गचे हिरोशिमा असे म्हणण्यात येते.
१९६९ : सफल मानवी चांद्रमोहिमेनंतर अपोलो ११ हे अंतराळयान पॅसिफिक समुद्रात सुखरूप उतरले.
१९७४ : वॉटरगेट प्रकरण अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला की राष्ट्राध्यक्ष रिर्चड निक्सनने स्वत:विरुद्धचा पुरावा अवैधरीत्या दडवून ठेवला होता.
१९९० : इराकने कुवेतच्या सीमेजवळ सैन्याची जमवाजमव करण्यास सुरूवात केली.
१९९१ : अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी आर्थिक सुधारणांचा पाया घालणारा? अर्थसंकल्प संसदेत सादर केला.
१९९७ : ख्यातनाम बंगाली लेखिका महाश्वेतादेवी यांना पत्रकारिता, साहित्य व कला या क्षेत्रातील कामगिरीसाठी 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
१९९७ : माजी हंगामी पंतप्रधान गुलझारीलाल नंदा आणि स्वातंत्र्यसैनिक अरुणा असफ अली यांना स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान
१९९८ : परकीय चलन नियमन कायद्याच्या जागी परकीय चलन व्यवस्थापन कायदा जारी करण्याचा केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय
२००० : विप्रो आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ स्पर्धेत चेन्नईच्या विजयालक्ष्मी सुब्रह्यण्यम हिने भारताच्याच पी. हरिकृष्णला बरोबरीत रोखल्यामुळे तिला अर्धा गुण मिळाला त्यामुळे तिच्या ग्रँडमास्टर या किताबावर शिक्कामोर्तब झाले व ती भारताची पहिला महिला ग्रँडमास्टर बनली.
२००१ : जपानमधील टोकियो येथे झालेल्या जागतिक जलतरण स्पर्धेत भारताच्या शिखा टंडनने फ्रीस्टाईल प्रकारात १०० मीटर अंतर ५९.९६ सेकंदात पार केले. ही शर्यत एक मिनिटापेक्षा कमी वेळात पूर्ण करणारी ती भारताची सर्वात लहान खेळाडू आहे.
२००४ : इटली देशाने भारतीय पर्यटकांसाठी सात नवीन वीजा कॉल सेंटर सुरु करण्याचा निर्णय घेतला.
२००५ : लान्स आर्मस्ट्राँगने 'टूर-डी-फ्रान्स' ही सायकल शर्यत सलग सातव्यांदा जिंकली.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८६ : फ्रेंच गणितज्ञ संशोधक जोसेफ निकोलेट यांचा जन्म.
१८०२ : फ्रेंच लेखक अलेक्झांड्रे ड्युमास यांचा जन्मदिन.
१८५१ : जर्मन गणितज्ञ फ्रेडरिक शॉटकी यांचा जन्म.
१९११ : गोविंदभाई श्रॉफ हैदराबाद मुक्तिसंग्रामातील झुंजार स्वातंत्र्य सेनानी (मृत्यू:)
१९११ : अमल ज्योती तथा 'पन्नालाल' घोष बासरीवादक व संगीतकार (मृत्यू: २० एप्रिल १९६०)
१९२४ : प्रसिद्ध भारतीय गजल गायक व उर्दू शायर(कवी) नाज़िश प्रतापगढ़ी यांचा जन्मदिन.
१९२८ : केशुभाई पटेल गुजरातचे मुख्यमंत्री आणि राज्यसभा सदस्य
१९३७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक मनोज कुमार यांचा जन्म.
१९४५ : अझीम प्रेमजी दानशूर व्यक्ति आणि 'विप्रो'चे चेअरमन
१९४७ : जहीर अब्बास पाकिस्तानी फलंदाज
१९६९ : जेनिफर लोपेझ अमेरिकन अभिनेत्री, गायिका आणि नर्तिका
१९८५ : पद्मश्री, पद्मभूषण, राजीव गांधी खेलरत्न, पुरस्कार विजेता उत्कृष्ट भारतीय बिलियड्र्स आणि स्नूकर खेळाडू पंकज अडवाणी यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११२९ : शिराकावा जपानी सम्राट (जन्म: ७ जुलै १०५३)
१९७० : भारतीय उद्योगपती पीटर दि नरोन्हा यांचे निधन. (जन्म: १९ एप्रिल १८९७)
१९७४ : सर जेम्स चॅडविक अणूमधील न्यूट्रॉनच्या शोधाबद्दल १९३५ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक (जन्म: २० आक्टोबर १८९१)
१९८० : अरुण कुमार चटर्जी तथा 'उत्तम कुमार' बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेते (जन्म: ३ सप्टेंबर १९२७)
१९८० : पीटर सेलर्स इंग्लिश विनोदी अभिनेता आणि गायक (जन्म: ८ सप्टेंबर १९२५)
२०१२ : सीटी स्कॅन चे शोधक रॉबर्ट लिडले यांचे निधन. (जन्म: २८ जुन १९२६)
२०१८ : माजी ब्रिटीश अष्टपैलू क्रिकेटपटू जॉन मुरे यांचे निधन.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शुक्रवार दि. २४ जुलै २०२६ ५



# विद्यार्थ्यावरील लाठीचार्ज हल्ला निषेधार्थ परभणीत कडकडीत बंद



परभणी । प्रतिनिधी

दिल्ली येथील संसद भवन जवळील जंतरमंतर मैदानावर सुरू असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा.या मागणी साठी शास्त्रज्ञ तथा सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक, कोर्क्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी मागील २२ दिवसांपासून उपोषण चालू केले आहे. त्यादरम्यान दिल्ली पोलिसांनी आंदोलक विद्यार्थ्यावर अमानुषपणे लाठीचार्ज, मारहाण, अश्रू धुर नळकांड्या फोडल्या. याच्या निषेधार्थ पूर्णा शहरात वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष यांच्या महाराष्ट्र बंद हाकेला ओ देत पूर्णा तालुका वंचित बहुजन आघाडीस सहकार्य करत व्यापारी बांधवांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून कडकडीत बंद पाळला.

आंदोलनात जखमी झालेल्या विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, मारहाण करणाऱ्या पोलीसांना निलंबित करण्यात यावे, नीट पेपरफुटी प्रकरण झाल्यानंतर वैद्यकीय शिक्षणावर परिणाम झालेल्या ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या.आंदोलनात सहभागी विद्यार्थ्या, विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज करुन अमानुष मारहाण करुन घायाळ केले. आंदोलन मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अ‍ॅड प्रकाश आंबेडकर यांनी तात्काळ गांभीर्य घेऊन महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. त्यामुळे पूर्णेत बंद पाळण्यात आला. यावेळी नीट पेपर फुटी झाल्यानंतर वैद्यकीय शिक्षणावर परिणाम झाल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या अशांच्या नातेवाईकांना एक कोटी रुपये आर्थिक मदत द्यावी. अशा स्वरुपाच्या विविध मागण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे युवक जिल्हाध्यक्ष तुषार गायकवाड,जि सं सुनील मगरे,रवि वाघमारे, श्यामसुंदर काळे,अजय काळे, तुकाराम भारती तसेच नगरसेवक प्रकाश दादा कांबळे, उत्तम दादा खंदारे,रऊफ सर, दादाराव पंडित,हाजी कुरेशी, राजकुमार सुर्यवंशी आदींचा नेतृत्वात सकाळी बुध्द विहारा पासून डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत मोर्चा काढण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भंतेजी डॉ. उपगुप्त महाथेरो, आंबेडकर चळवळीचे नेते नगरसेवक प्रकाश कांबळे, रऊफ कुरेशी, वंचितचे युवक जिल्हाध्यक्ष तुषार गायकवाड, नगरसेवक उत्तम खंदारे, बोरगावकर,अतिक यासह आदींनी सरकारच्या आडमुठ्या धोरणा विरुद्ध खरपूस समाचार घेतला. यानंतर मागण्याचे निवेदन पोनि सचिन बेंद्रे यांच्या मार्फत राष्ट्रपती यांना देण्यात आले. यावेळी असंख्य नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते. शहरात एकही दुकान चालू न ठेवता शंभर टक्के कडकडीत बंद पाळण्यात आला. दिल्लीमधील जंतर मंतर येथे निट पेपर फुटी विरोधात आंदोलन करत असलेल्या विद्यार्थ्यांना पाठींबा देण्यासाठी व अमानवीय लाठीहल्याचा धिक्कार करत माकपच्या वतीने सेलू तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी २० जुलै रोजी दिल्ली आंदोलक विद्यार्थी युवक मोदी सरकारने अमानुषपणे लाठी हल्ला करून अनेक आंदोलकांना जखमी केले आहे. त्याचा तिव्र निषेध करत पुढील काळात आंदोलन तिव्र करण्याचा इशारा देण्यात आला. जंतर मंतर आंदोलनातील लाठीहल्याची न्यायालयीन चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करा. नीट पेपर फुटी प्रकरणी दोषी असलेल्या केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची हकालपट्टी करा. नीट पेपर फुटी आंदोलनात शहीद झालेल्यांना १ कोटी रुपये भरपाई द्या; अशी मागणी त्यांनी केली आहे. यावेळी आंदोलनात कॉम्रेड रामेश्वर पौळ, सुभाष शहाणे रोहीदास हातकडके, आकाश खनपटे, ज्ञानेश्वर पौळ, विष्णू चव्हाण, विनोद धापसे, गौरव कारके सहभागी झाले होते.

### पाथरीत कडकडीत बंद :

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पाथरी शहर बंद ठेवण्यात आले व तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने काढण्यात आलेल्या निषेध मोर्चात उबाठा शिवसेना, किसान सभा व इतर पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. पाथरी तहसील कार्यालयावर काढण्यात आलेल्या निषेध मोर्चात वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश उजगरे,तालुका अध्यक्ष दिनकर कदम, जिल्हा उपाध्यक्ष दिलिप मोरे, अवडाजी ढवळे, मंचक हारकळ, उबाठा शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र धर्मे, हरिभाऊ वाकानकर,अ‍ॅड अशोक पोटभरे यांच्यासह पदाधिकारी व सर्व पक्षिय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. तहसीवर काढण्यात आलेल्या मोर्चा वेळी प्रकाश उजगरे, रविंद्र धर्मे, कॉ. दिपक लिपने यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रशासनाला निषेधाचे निवेदन देण्यात आले.

### मानवत बंदला मोठा प्रतिसाद

वंचीत बहुजन आघाडीच्या वतीने गुरुवारी पुकारण्यात आलेल्या मानवत शहर बंदला मोठा प्रतिसाद मिळाला. या बंदला काँग्रेस व शिवसेना उबाठाच्या वतीने पाठिंबा होता. अत्यावश्यक सेवा वगळता शहराची सर्व बाजारपेठ कडकडीत बंद राहिली. आंदोलनकर्त्यांनी तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांना मागण्याचे निवेदन सादर केले. बंदच्या यशस्वीतेसाठी वंचित चे जिल्हा उपाध्यक्ष नंदकिशोर कुमावत, धम्मपाल सोनटक्के, संपत पंडित महेंद्र ठेंगे आनंद भदर्गे दीपक ठेंगे वशिष्ठ मोरे मिलिंद मोरे बाळासाहेब कांबळे राजकुमार खरात मुकुंद मोरे दिलीप काकडे चंद्रकांत मगर गोविंद घांडगे व्यंकटेश चौधरी यांच्यासह काँग्रेसचे तालुका अध्यक्ष एडवोकेट रमेश जाधव, सेनेचे तालुकाध्यक्ष प्रभाकर कदम यांनी प्रयत्न केले.

## खा. राहुल गांधी यांच्या अटकेच्या निषेधार्थ काँग्रेस उतरली रस्त्यावर

धाराशिव। प्रतिनिधी

शिक्षण व्यवस्थेतील अनागोंदी, नीट पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार तसेच विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांच्या अटकेच्या निषेधार्थ काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

जंतर-मंतर येथे पेपरफुटी, बेरोजगारी आणि भरती प्रक्रियेतील गैरव्यवहारांविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांची भेट घेण्यासाठी गेलेल्या राहुल गांधी यांना पोलिसांनी ताब्यात घेतले व अटक केली. ही कारवाई लोकशाही मूल्यांवर आघात करणारी असल्याची टीका काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली. विद्यार्थी पेपरफुटीविरोधात आवाज उठवत आहेत, बेरोजगार युवक रोजगाराची मागणी करत आहेत; मात्र त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी सरकारकडून दडपशाही केली जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

नीट पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही करण्यात आली. यावेळी केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध करत प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले.

## अजितदादांनी दिलेली शिकवण समोर ठेवून काम करत राहू - आ. विक्रम काळे





जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी संपूर्ण आयुष्यात सामान्य माणसाला समोर ठेवून काम करण्याची दिलेली शिकवण व कानमंत्र नेहमी लक्षात ठेवूनच काम करत राहू असे प्रतिपादन मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी केले.महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंती निमित्त बाजीराव पाटील चव्हाण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, श्री गणपती नेत्रालय व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने सदानंद महाराज मठ, धारकल्याण ता.जालना येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व चष्मे वाटप शिबिराचे उद्घाटन प्रसंगी आमदार काळे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण व प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक सेलचे प्रदेशाध्यक्ष नाझेर काझी, भटके विमुक्त सेलप्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड, शहर जिल्हाध्यक्ष शेख महमूद, शकुंतलाताई कदम, शाह आलम खान, मंगलाताई पाटील अण्णासाहेब चित्तेकर , सोपानराव तेलगड, धैर्यशील चव्हाण, प्रा.सुखदेव मांटे, पुष्पाताई चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती .

यावेळी पुढे बोलताना आमदार विक्रम काळे म्हणाले की, अजितदादा पवार शिस्तीचे भोगते तसेच वेळेचे टाईम कीपर होते . सकाळपासून लोकांची कामे करणारा व दिलेला शब्द पाळणारा नेता अशी त्यांची ख्याती होती. राज्याचे नेतृत्व करत असताना त्यांनी बारामती व काटेवाडीची नाळ कधी तुटू दिली नाही. जालना जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांचे नेतृत्वाखाली चांगल्या प्रकारे चालू असून मागील २२ वर्षापासून येथे अजित दादांचे वाढदिवस व आता पुण्यतिथीनिमित्त आरोग्य शिबिर तसेच इतर सामाजिक उपक्रम राबविले जाणारा महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा आहे. यापुढे ज्यावेळी संधी येईल त्यावेळी मराठवाड्यातून अरविंद अण्णा चव्हाण यांना काम करण्यासाठी पक्षातर्फे बळ देण्याचे काम करू . तुम्ही ही जी सेवा करत आहात त्याला बळ देण्यासाठी मी आलो असून यापुढेही येत राहू असा शब्द आमदार काळे यांनी यावेळी दिला. याप्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंद चव्हाण म्हणाले की, अजित दादा चे निधनाने राज्याचे राजकारणातला वेग, वचक व रांगडेपणा गेला असून प्रशासनावर प्रचंड वचक असणारा जाती धर्माचे पलीकडे जाऊन १८ तास काम करणारा तसेच प्रचंड लोकसंग्रह असलेला नेता आपण गमावला आहे . अजितदादांनी दिलेल्या शिकवणीतूनच आपण यापूर्वी त्यांचे वाढदिवस व आता पुण्यतिथीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवित असल्याचे ते म्हणाले. सदरील शिबिरात ९१० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली तर २७२ रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करून ३९५ रुग्णांना चष्मे वाटप करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र मानेगाव अंतर्गत कार्यरत सेविकांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. तसेच नागरिकांना मोफत आयुष्यमान भारत कार्ड चे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास रिंकल तायड, शितल बारोटे, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते व परिसरातून आलेल्या रुग्णांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कत्तलीच्या उद्देशाने वाहतूक, २७ गोवंश जनावरांची सुटका

संभाजीनगर । प्रतिनिधी

कत्तलीच्या उद्देशाने अवैधरीत्या वाहतूक करण्यात येत असलेल्या २७ गोवंश जनावरांची फुलंब्री पोलिसांनी सुटका करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत २७ बैलांसह कंटेनर असा एकूण ३१ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणी इरफान शेख मेहमूद (३७, रा. ईदगाहनगर, ता. सिल्लोड) व असलम सुपडू कुरेशी (२२, रा. ईदगाहनगर, ता. सिल्लोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, प्राण्यांवरील क्रूरता आणि अवैध कत्तलीस प्रतिबंध करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच मोहिमेअंतर्गत फुलंब्री पोलिसांनी ही कारवाई केली. २१ जुलै रोजी रात्री ११.३० वाजता जळगाव-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील चौका बसस्थानकाजवळ संशयास्पदरीत्या जात असलेल्या कंटेनरची तपासणी करण्यात आली. यावेळी कंटेनरमध्ये २७ बैलांना अत्यंत अमानुष पद्धतीने दाटीवाटीने कोंबून दोऱ्यांनी घट्ट बांधून वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. जनावरांना हालचालीसाठी कोणतीही जागा नसल्याने त्यांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला होता. कारवाईदरम्यान १३ लाख ५० हजार रुपये किमतीचे २७गोवंश जनावरे आणि १८ लाख रुपये किमतीचा कंटेनर असा एकूण ३१ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सुटका करण्यात आलेल्या गोवंश जनावरांना पाल येथील मातोश्री प्रयागबाई जाधव येथे दाखल करण्यात आले. आरोपींकडे जनावरांच्या वाहतुकीसाठी आवश्यक असलेली कोणतीही वैध परवानगी अथवा कागदपत्रे आढळून आली नसल्याचे पोलिसांनी सांगितले. प्राथमिक चौकशीत ही जनावरे बेकायदेशीर कत्तलीच्या उद्देशाने नेण्यात येत असल्याचे समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक प्रताप नवघरे, पोलिस उपनिरीक्षक राम बारहाते, ग्रेड पोलिस उपनिरीक्षक राजेश दवंगे तसेच पोलिस अंमलदार नागलोत, शिंदे, घुसिंगे, गायकवाड, मसलकर, कांबळे, वक्ते आणि आरखडे यांच्या पथकाने केली.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २१४३/२०२५**
**आदित्य श्रीहरी धपाटे**
**ग्रा. पं. कार्यालय, कळसंबर**

पहा

आदित्य श्रीहरी धपाटे, स. कळसंबर ता. जि. बीड उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक आदित्य श्रीहरी धपाटे यांचा दिना० ०८/०७/२००७ जी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालयान प कार्यालयात कळसंबर ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कळसब ता. जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/८/२०२६ ही आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२६/ सेतु/कावि-७४७**
**दिनांक - ०३/०७/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती सय्यद सोहेल सय्यद जाकेर रा. मु.दर्गा पो.पराडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या नातीच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | जोहान सोहेल सय्यद | मुलगा | २२/०८/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२३/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज २२०/२०२६**
**अजित व इतर विरुध्द निरंक**
**मार्फत :- अ‍ॅड. जे. एस. पठाण**

अर्जदार :- १) अजित पि. कल्याण अडागळे, वय-३४ वर्षे, धंदा- शेती, २) छाया भ्र. राहुल अडागळे, वय ३१ वर्षे, धंदा शेती,३) अनुष्का पि. राहुल अडागळे अपाक छाया राहुल अडागळे, वय-१० वर्षे, धंदा शिक्षण,४) तन्वी पि. राहुल अडागळे अपाक छाया राहुल अडागळे, वय-१० वर्षे, धंदा- शिक्षण,५) जान्हवी पि. राहुल अडागळे अपाक छाया राहुल अडागळे, वय-१३ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. वरील सर्व पाटोदा ता. पाटोदा जि. बीड.६) मोनिका भ्र. संदिप पवार, वय-३२ वर्षे, धंदा- शेती,

रा. सोनार गल्ली, कर्जत ता. कर्जत जि. अहमदनगर

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कल्याण पि. गणपती अडागळे, रा. मौजे ता. पाटोदा जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी कल्याण पि. गणपती अडागळे यांचा मृत्यु दिनांक ०९/०३/२०२६ रोजी पाटोदा ता. पाटोदा जि. बीड या ठिकाणी मयत झालेले आहेत तसेच मयताची पत्नी यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ ही मयताची सुन आहे. अर्जदार क्र. ३ ते ५ या मयताच्या नाती आहेत. अर्जदार क्र. ६ मयत कल्याण यांची विवाहीत मुलगी आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत कल्याण पि. गणपती अडागळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २३ जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १४ ऑगस्ट २०२६.

स्वाक्षरित
**क. लिपीक**

**आदेशावरुन**
स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड.**

# वैद्यनाथांची पावन भूमी जल आणि पर्यावरण समृद्ध होणार -मयंक गांधी

### २५ लक्ष वृक्ष लागवड व संवर्धन महाअभियानाचा शुभारंभ



परळी । प्रतिनिधी

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वाचे औचित्य साधत ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विक्रमी २५ लक्ष वृक्ष लागवड व संवर्धन महाअभियानाचा परळी वैजनाथ येथे उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ झाला. या अभियानाला विविध नगरपालिका, नगरपंचायती, ग्रामपंचायती, सामाजिक संस्था, शेतकरी आणि हजारो नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला असून, शुभारंभाच्या पहिल्याच दिवशी तब्बल ८ लाख फळबाग व सामाजिक वृक्ष लागवडीची नोंद करण्यात आली. हा शुभारंभ जलनायक मयंक गांधी, परळी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, मुख्याधिकारी श्री. निगळ, हरित लातूर चळवळीचे डॉ.पवन लड्डा, वन परिक्षेत्र अधिकारी भगवानराव गित्ते, साई अकादमीचे चव्हाण तसेच इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. हे अभियान २३ ते २९ जुलै या कालावधीत संपूर्ण मराठवाड्यात लोकसहभागातून राबविण्यात येणार आहे.

प्रभू वैद्यनाथांच्या पावन नगरीत ग्लोबल विकास ट्रस्ट, परळी नगरपरिषद आणि वृक्षसंवर्धन चळवळीच्या संयुक्त विद्यमाने शहरात ३ लाख वृक्षांची लागवड व संगोपन करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. धार्मिक महत्त्व लक्षात घेऊन १० हजार बेलवृक्षांची लागवड करण्यात येणार असून, औष्णिक विद्युत केंद्राने उपलब्ध करून दिलेल्या जागेवर घनदाट वन (मियावाकी पद्धतीने) वृक्ष लागवड केली जाणार आहे. या अभियानासाठी आवश्यक वृक्षरोपे ग्लोबल विकास ट्रस्ट उपलब्ध करून देत असून, लागवडीनंतर त्यांचे संगोपन करण्याची संपूर्ण जबाबदारी नगरपरिषद आणि वृक्षसंवर्धन चळवळीने स्वीकारली आहे. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी म्हणाले, ''परळी वैजनाथ ही प्रभू वैद्यनाथांच्या वास्तव्याने पावन झालेली नगरी आहे. या शहराला धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व लाभले आहे. या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वप्रथम पाण्याची उपलब्धता आवश्यक होती. त्यामुळे ग्लोबल विकास ट्रस्टने यावर्षी परळी तालुक्यात ११४ किलोमीटर नदीचे खोलीकरण व रुंदीकरण, तसेच रिचार्ज बोअरवेल उभारणीचे महत्त्वपूर्ण काम केले. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. आता जलसमृद्धीनंतर पर्यावरण समृद्धीचा संकल्प आपण वृक्ष लागवडीच्या माध्यमातून पूर्ण करत आहोत. लोकसहभागातून राबविले जाणारे हे अभियान परळी तालुक्याला जल, हरित आणि पर्यावरण समृद्ध बनविणारे ठरेल. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने सुरू झालेल्या या ऐतिहासिक अभियानाला संपूर्ण परिसरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नगरपालिका, नगरपंचायती, ग्रामपंचायती, विविध सेवाभावी संस्था, सामाजिक संघटना तसेच वैयक्तिक स्तरावर हजारो शेतकरी आणि नागरिक या अभियानात सहभागी झाले आहेत. पहिल्याच दिवशी ८ लाख वृक्ष लागवडीची नोंद झाल्याने हे अभियान पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने लोकचळवळ ठरत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# घळाटवाडीच्या सरपंच संगिता येताळ अपात्र

## तीन अपत्य प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांचा मोठा निर्णय; माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचांविरोधातील अपील मंजूर

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील घळाटवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच संगिता हरीभाऊ येताळ यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १४ (ज-१) अन्वये सरपंच पदासाठी अपात्र घोषित करण्यात आले आहे. तीन अपत्ये असतानाही नामनिर्देशनपत्र दाखल करताना दोनच अपत्ये असल्याचे स्वयंघोषणापत्र सादर करून माहिती लपविल्याचा आरोप करीत विशाल चांगदेव ससाणे यांनी दाखल केलेले अपील जिल्हाधिकारी बीड यांनी मंजूर केले आहे. १६ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत निर्णय दिला.

अर्जदार विशाल चांगदेव ससाणे यांच्या म्हणण्यानुसार, संगिता येताळ यांनी सरपंच पदासाठी नामनिर्देशनपत्र दाखल करताना दोनच अपत्ये असल्याचे स्वयंघोषणापत्र दिले होते. मात्र, त्यांचा पती हरिभाऊ येताळ यांच्या कुटुंबातील तीन अपत्यांच्या शाळेतील प्रवेश-निर्गम अभिलेखांच्या प्रती सादर करण्यात आल्या. यामध्ये अंजना हरिभाऊ येताळ हिची जन्मतारीख २० ऑक्टोबर १९९७, वैजनाथ हरिभाऊ येताळ यांची जन्मतारीख ९ मार्च २००१ आणि नवनाथ हरिभाऊ येताळ यांची जन्मतारीख ४ एप्रिल २००३ अशी नमूद असल्याचे सांगण्यात आले. अर्जदाराने असा दावा केला की, १२ सप्टेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य जन्माला आल्यास संबंधित व्यक्ती ग्रामपंचायत निवडणूक लढविण्यास अपात्र ठरते. त्यामुळे ४ एप्रिल २००३ रोजी जन्मलेल्या नवनाथ यांच्या जन्मतारखेच्या आधारे संगिता येताळ या सरपंच पदासाठी अपात्र ठरतात, असा युक्तिवाद करण्यात




आला. तसेच अपत्यांची संख्या लपवून शासन, निवडणूक प्रशासन आणि मतदारांची दिशाभूल केल्याचा आरोपही करण्यात आला.

दुसरीकडे, संगिता येताळ यांच्या वतीने या आरोपांना विरोध करण्यात आला. अंजना ही त्यांची मुलगी नसून त्यांचे पती हरिभाऊ येताळ यांच्या पहिल्या पत्नीपासून झालेली मुलगी

### फौजदारी कारवाईसाठी चौकशीचे आदेश

असल्याचा बचाव घेण्यात आला. पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर हरिभाऊ येताळ यांनी संगिता यांच्याशी दुसरे लग्न केले आणि त्यानंतर वैजनाथ व नवनाथ ही दोन अपत्ये झाल्याचे त्यांच्या वतीने सांगण्यात आले. त्यामुळे नामनिर्देशनपत्रात दोन अपत्यांची माहिती देणे योग्य असल्याचा दावा करण्यात आला. मात्र, या बचावासाठी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये विसंगती असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. न्यायाधिकरणातील प्रकरणाच्या अर्ज व निर्णयप्रतीमध्ये पहिल्या पत्नी संगीता हरिभाऊ येताळ यांच्या मृत्यूची तारीख २७ मे १९९४ अशी नमूद असल्याचे दिसून आले. तर सादर करण्यात आलेल्या मृत्यू प्रमाणपत्रात मृत्यूची तारीख २५ मार्च १९९८ अशी नमूद असल्याने दोन्ही कागदपत्रांमध्ये विसंगती आढळल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले.उपलब्ध शाळेचे अभिलेख, नामनिर्देशनपत्रातील माहिती, स्वयंघोषणापत्र तसेच दोन्ही बाजूंचे म्हणणे आणि इतर कागदपत्रांचा विचार केल्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांनी विशाल चांगदेव ससाणे यांचे अपील मंजूर केले. आदेशानुसार, संगिता हरीभाऊ येताळ यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १४ (ज-१) अन्वये घळाटवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी अपात्र घोषित करण्यात आले आहे.

तसेच नामनिर्देशनपत्रामध्ये चुकीची माहिती सादर करून शासन, निवडणूक प्रशासन व मतदारांची दिशाभूल केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने संगिता येताळ यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच इतर लागू कायद्यांनुसार फौजदारी कारवाई करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून संबंधित पोलीस ठाणे माजलगाव ग्रामीण येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश गटविकास अधिकारी, पंचायत समिती माजलगाव यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयानंतर घळाटवाडी ग्रामपंचायतीच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून, पुढील प्रशासकीय आणि कायदेशीर कार्यवाहीकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# धर्मेंद्र प्रधान, सदाभाऊ खोत 'यांच्या प्रतिमेला 'जोडे मारो' आंदोलन

लिंबागणेश । प्रतिनिधी

दिल्लीतील जंतरमंतर येथे नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याचा तसेच आंदोलनकर्त्यांबाबत सदाभाऊ खोत यांनी 'दहशतवादी' संबोधुन करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ आज दि.२३ गुरुवारी लिंबागणेश ता.बीड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली 'आंदोलन करण्यात आले.छत्रपती




शिवाजी महाराज चौकात आयोजित या आंदोलनात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान व सदाभाऊ खोत यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, दिल्ली पोलिस मुर्दाबाद, विद्यार्थ्यांवरील अत्याचार बंद करा ' सदाभाऊ नव्हे हा तर भाडखाऊ 'अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.आंदोलनानंतर जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक, बीड यांच्या मार्फत ◀◀ पान ३ वर

### विद्यार्थ्यांवरील लाठीमार लोकशाहीला कालिमा – डॉ. गणेश ढवळे

लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना व विद्यार्थ्यांना शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करून आपल्या मागण्या मांडण्याचा घटनात्मक अधिकार आहे. जंतरमंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेला कथित लाठीमार हा लोकशाही मूल्यांवर आघात असून, या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली.

# बीडमध्ये २ ऑगस्टला महाराजस्व समाधान शिबीर; नियोजनासाठी प्रशासनाची बैठक

## शिबिराच्या नियोजनासाठी महसूल मंत्र्यांकडून निमंत्रित डॉ.योगेश क्षीरसागर यांची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या लोकाभिमुख प्रशासनाच्या संकल्पनेला चालना देण्यासाठी बीड विधानसभा मतदारसंघासाठी बीड शहरातील अंबिका लॉन्स येथे रविवार, दि.२ ऑगस्ट रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' आयोजित करण्यात येणार आहे. या शिबिराच्या प्रभावी



नियोजनासाठी गुरुवारी (दि.२३) बीड तहसीलदार कार्यालयात महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. या शिबिराच्या नियोजनासाठी महसूल मंत्र्यांकडून निमंत्रण असलेले समन्वयक, बीड विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आवश्यक नियोजनाबाबत बैठकीत सविस्तर चर्चा केली.

मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. सुनेत्राताई पवार आणि पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ◀◀ पान ३ वर

# पेपर लीक बंद करा; धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या! महाराष्ट्र बंदच्या हाकेला दिंद्रुडकरांचा प्रतिसाद

दिंद्रुड । प्रतिनिधी

दिल्लीतील जंतरमंतर येथे विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या सह विविध संघटनांनी दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला दिंद्रुडकरांनी गुरुवारी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गावात कडकडीत बंद पाळण्यात आला.

बंदच्या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधी कन्या विद्यालय, लोकशक्ती विद्यालय व डॉ. सोनाजीराव



रांजवन माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गावातून फेरी काढून केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली. विद्यार्थ्यांनी पेपर लीक बंद करा, धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, विद्यार्थ्यांना न्याय द्या, भ्रष्टाचाराचा निषेध असो, आमच्या भविष्याशी खेळणं बंद करा, जबाबदारांवर कठोर कारवाई करा, विद्यार्थी एकता जिंदाबाद, लोकशाहीचा विजय असो आणि शिक्षण वाचवा, ◀◀ पान ३ वर

# बीड पोलिसांची धडक कारवाई: कुख्यात टोळी जेरबंद; ६ लाख ७९ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अत्यंत धडाडीची कामगिरी करत धारूर, केज व नेकनूर परिसरातील वेगवेगळ्या गुन्ह्यांत सक्रिय असलेल्या कुख्यात गुन्हेगारांच्या टोळीला जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून अनेक गुन्हे उघडकीस आले आहेत.

गुप्त बातमीदाराकडून मिळालेली माहिती आणि सापळा

पोलिसांकडून मिळालेल्या



अधिकृत माहितीनुसार, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या सूचनेनुसार पोउपनि महेश विघ्ने व त्यांचे पथक केज उपविभागात गुन्हेगारांचा शोध घेत होते. दरम्यान, गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, काही दिवसांपूर्वी प्रकाश उर्फ गुड्या काळे (रा. मोहा) याने आपल्या साथीदारांसह पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीतून (क्र. एमएच १२ एचएफ ४२४५) धारूर येथून रात्रीच्या वेळी शेळ्या चोरल्या होत्या आणि दोन दिवसांपूर्वी केज येथून कॉपरची चोरी केली असून, आज ती विक्री करण्यासाठी तो कळंब येथे जाणार आहे.

या माहितीच्या आधारे पोउपनि विघ्ने व त्यांच्या पथकाने मोहा गावाच्या दिशेने धाव घेतली. दुपारी दोन वाजेच्या सुमारास हॉटेल कुलस्वामिनीपासून मोहा गावात जाणाऱ्या रस्त्यावर बातमीदाराने सांगितलेल्या क्रमांकाची स्कॉर्पिओ गाडी अडवली. त्या गाडीत एकूण सहा इसम मिळून आले. मात्र, पोलिसांना पाहताच त्यातील दोन आरोपी पोलीस पार्टीला धक्का देऊन पळून जाण्यात यशस्वी झाले.

जेरबंद करण्यात आलेले मुख्य आरोपी:१) प्रकाश उर्फ गुड्या शाहाजी काळे२) शहाजी शेषेराव पवार३) संतोष बारीकराव शिंदे (सर्व रा. मोहा पारधी वस्ती, ता. कळंब, जि. धाराशिव)४) दिनेश नागनाथ काळे ◀◀ पान ३ वर

# महिलेच्या सततच्या मानसिक त्रासाला कंटाळून हॉटेल व्यावसायिकाची गळफास घेऊन आत्महत्या

केज । प्रतिनिधी

एका डोकेदुखी ठरलेल्या महिलेच्या सततच्या मानसिक त्रासाला, फोनवरील शिवीगाळ आणि ब्लॅकमेलिंगला वैतागून बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील एका हॉटेल व्यावसायिकाने लातूरमध्ये गळफास घेऊन आपले जीवन संपवल्याची घटना समोर आली आहे. केज तालुक्यातील सोनीजवळा येथील रहिवासी असलेले प्रकाश नानासाहेब भांडवलकर (४१ वर्षे) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी मृत तरुणाच्या वडिलांच्या फिर्यादीवरून लातूरच्या एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेच्या अवघ्या काही तासांतच आरोपी महिलेला पोलिसांनी जेरबंद केले आहे.



पोलीस सूत्रांनी दिलेल्या अधिकृत एफआयआर दस्तऐवजातील माहितीनुसार, मृत प्रकाश भांडवलकर हे लातूर शहरातील एम.आय.डी.सी. परिसरात हॉटेल व्यवसाय करत होते. त्यांची पत्नी नोकरीनिमित्त माजलगाव येथे राहत असल्याने प्रकाश हे लातूरमधील श्रीनगर भागात भाड्याच्या खोलीत एकटेच वास्तव्यास होते. हॉटेल व्यवसायाच्या निमित्ताने त्यांची ओळख रुपाली गरड उर्फ रुक्मिणी सुधीर अंधारे (रा. श्रीनगर, एम.आय.डी.सी., लातूर) या महिलेशी झाली होती. ओळख झाल्यानंतर सदर महिलेने प्रकाश यांच्या कौटुंबिक अडचणींचा फायदा घेत त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना फोनवरून सतत शिवीगाळ करणे, धमकी देणे व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली होती. या छळाला कंटाळून भांडवलकर कुटुंबाने १९ मे २०२६ रोजी केज पोलीस ठाण्यात यापूर्वीच तक्रार अर्ज दाखल केला होता.

त्यानंतरही आरोपी महिलेचा त्रास सुरूच राहिला. रविवारी, १९ जुलै २०२६ रोजी सकाळी १०:०४ वाजेच्या सुमारास आरोपी महिला रुपाली अंधारे हिने थेट प्रकाश यांच्या ६५ वर्षीय वृद्ध वडिलांना फोन केला आणि पप्पू शेठ गेला आहे, तुम्ही तात्काळ लातूरला या, असे थंडपणे ◀◀ पान ३ वर

# राज्यभर संताप : बीड जिल्ह्यात कडकडीत बंद





बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर लाठीमार प्रकरणाचा निषेध म्हणून वंचित बहुजन आघाडीने गुरुवारी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती.वंचितच्या या बंदला बीड जिल्ह्यात प्रतिसाद मिळाला असून व्यापाऱ्यांनी शहरातील बाजारपेठा स्वयंस्फूर्तीने बंद ठेवण्यात आल्या आहेत. दिल्ली येथील जंतर मंतर आणि संसद परिसरात शांततापूर्ण विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर लाठीमार प्रकरणाचा निषेध म्हणून वंचित बहुजन आघाडीने गुरुवार (दि.२३) रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. वंचितच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शहरातील प्रमुख मार्ग असलेल्या नगर रोड,सुभाष रोडवर फेरी काढत बंदचे आवाहन केले. त्याला प्रतिसाद देत बाजारपेठेमध्ये व्यापाऱ्यांनी आपली दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवली आहेत.

# जि.प. शाळा, अंगणवाडीच्या रस्त्यावर घाणीचे साम्राज्य



### युसूफवडगांव ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष; बेशिस्त नागरिकांकडून कचरा टाकण्याचा प्रकार

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरले असून, याकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे. विशेष म्हणजे, या रस्त्यावरून दररोज शाळा व अंगणवाडीत जाणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थ्यांची ये-जा असते. तसेच शाळेच्या मैदानातही लहान मुले खेळत असतात.

शाळेसमोरील भागात राहणाऱ्या काही बेशिस्त नागरिकांकडून घरातील कचरा जाणीवपूर्वक या रस्त्यावर टाकला जात असल्याचे दिसून येत आहे. एवढेच नव्हे, तर मृत प्राण्यांची विल्हेवाटही याच ठिकाणी लावली जात असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी याठिकाणी मृत मांजर टाकण्यात ◀◀ पान ३ वर

# प्रभाग २ मध्ये मोफत आयुष्मान भारत आणि रेशन कार्ड घरपोच मिळणार

किल्लेधारूर । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जयसिंग भैय्या सोळंके सेवा प्रतिष्ठानतर्फे प्रभाग क्र. ०२ मधील नागरिकांसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २२ ते २६ जुलै २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या उपक्रमात मोफत आयुष्मान भारत कार्ड, घरपोच रेशन कार्ड आणि ज्येष्ठ नागरिकांचा अपघाती विमा या सुविधा दिल्या जातील.

नागरिकांना रांगेत उभे राहावे लागू नये म्हणून आयोजकांचे प्रतिनिधी थेट घरी येऊन कागदपत्रे गोळा करतील. आयुष्मान भारत कार्डमुळे नागरिकांना अंगीकृत रुग्णालयांमध्ये दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत वैद्यकीय उपचार मिळतील.

लागणारी कागदपत्रे १) आधार कार्ड

२) १२ अंकी रेशन कार्ड क्रमांक ३) आधार लिंक असलेला मोबाईल नंबर मुख्य आयोजक गटनेते नितीन शिवाजीराव शिनगारे असून, अधिक माहितीसाठी अश्विन गुळवे (९७३०७२३०९८) रेहान शेख (९६९९१९३७९९) यांच्याशी संपर्क साधावा. या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नीट पेपरफुटीविरोधातील आंदोलनाला पाठिंबा शिरूर कासार बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

शिरूर कासार । प्रतिनिधी

नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या निषेधार्थ दिल्ली येथे विद्यार्थ्यांचे गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी तसेच आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिसी अत्याचाराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्र बंदचे आवाहन केले होते. या बंदला शिरूर कासार शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

वंचित बहुजन आघाडीच्या बंदच्या आवाहनाला विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी पाठिंबा दिला. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय काँग्रेस यांच्यासह विविध पक्ष व संघटनांच्या समर्थनामुळे शिरूर कासार शहर बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले होते.

या आवाहनाला शहरातील व्यापारी वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपली दुकाने, हॉटेल्स आणि बाजारपेठेतील बहुतांश व्यवहार बंद ठेवले. दवाखाने व औषध दुकाने यांसारख्या अत्यावश्यक सेवा वगळता शहरातील सर्व व्यवहार बंद होते.

बंदच्या पार्श्वभूमीवर सकाळपासून कार्यकर्त्यांनी शहरातून फिरून व्यापारी व नागरिकांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. बंददरम्यान पोलिसांनी शहरात चोख बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही आणि बंद शांततेत पार पडला. दरम्यान, शिरूर कासार शहरातील बंद शंभर टक्के यशस्वी झाल्याचा दावा सामाजिक कार्यकर्ते युवराज सोनावणे आणि वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष दिलीप माने यांनी केला आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26